दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१४२ | मंगळवार दि.११ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# 23 जिल्ह्यांत शेतकरी उतरले रस्त्यावर!

## नियमित कर्जदारांना २ लाख द्या, कृषिमंत्र्यांच्या घरासमोर महामुक्काम आंदोलन करण्याचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

**नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान द्यावे, पीक विम्याचे ट्रिगर पुन्हा लागू करावेत, वन, देवस्थान, गायरान, वरकस व घरांच्या तळ जमिनी नावे करावीत आदी मागण्यांसाठी सोमवारी (दि. १० ऑगस्ट) राज्यातील २३ जिल्ह्यात किसान सभेच्या नेतृत्त्वाखाली शेतकऱ्यांनी जेल भरो आंदोलने केली.**

ठाणे-पालघर, नाशिक, अहिल्यानगर, सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे, बीड, परभणी, नांदेड, वर्धा, यवतमाळ, अमरावती, बुलडाणा, नंदुरबार आदी २३ जिल्ह्यांमध्ये आंदोलने करून निवेदने देण्यात आली. सरकारने आंदोलनाची दखल न घेतल्यास किसान सभेच्या नेतृत्वाखाली २० ऑगस्ट रोजी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या



घरासमोर बेमुदत राज्यव्यापी महामुक्काम आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. नियमित कर्जदारांची केवळ ५० हजारांवर बोळवणूक करण्यात आली. आम्ही नियमित कर्ज भरले म्हणून चूक केली का? आम्हाला शिक्षा का करताहेत? अशी त्यांची भावना आहे. यासाठी आज किसान सभेच्या वतीने राज्यभर आवाज उठवण्यात आला, अशी माहिती अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी दिली. त्याचसोबतच ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### अभिषेक बॅनर्जी यांना परदेशी जाण्यास परवानगी

कोलकाता: सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तृणमूल काँग्रेसचे (टीएमसी) सरचिटणीस आणि लोकसभा खासदार अभिषेक बॅनर्जी यांना डोळ्यांच्या उपचारासाठी तीन आठवड्यांकरिता परदेशात जाण्याची परवानगी दिली. देशाबाहेरील त्यांच्या हालचालींवरील निर्बंध शिथिल करण्यास कलकत्ता उच्च न्यायालयाने दिलेला नकार न्यायालयाने फेटाळला आहे. हा आदेश भारताचे सरन्यायाधीश (सीजेआय) सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने दिला. अभिषेक बॅनर्जी यांनी परदेश प्रवासाची परवानगी मागितलेली त्यांची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्याच्या निर्णयाला आव्हान दिले होते. ५ ऑगस्ट रोजी वादग्रस्त आदेश देताना, न्यायाल४याने नमूद केले होते की, खासदार अभिषेक बॅनर्जी आपल्या प्रकृतीच्या मूल्यांकनासाठी कोलकाता येथील सरकारी रुग्णालयातील वैद्यकीय मंडळासमोर हजर राहण्यास तयार नव्हते.

### काल्पनिक संभाषणात रस नाही-राहुल गांधी

दिल्ली: लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी विद्यार्थी प्रश्नांवर चर्चा करण्याचा सरकारचा प्रस्ताव फेटाळून लावला आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित गोळीबाराचा आदेश कोणी दिला, याचे उत्तर आधी द्यावे अशी मागणी केली. राहुल गांधी म्हणाले की, विरोधी पक्ष अमित शाह यांना केवळ संसदेत येऊन सामान्य विषयांवर भाषण देण्यास सांगत नव्हता. त्यांची मागणी होती की, गृहमंत्री यांनी २० जून रोजी दिल्लीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईचे आदेश दिले होते का, हे स्पष्ट करावे. राहुल गांधी म्हणाले की, प्रश्न कधीच असा नव्हता की अमित शाह संसदेत येऊन काही सामान्य विषयांवर भाषण देणार आहेत. प्रश्न नेहमीच हा होता की, अमित शाह यांनी हे स्पष्ट केले पाहिजे की दिल्लीतील आमच्या तरुणांवर झालेल्या गोळीबाराचा आदेश कोणी दिला.

### शिंदेंची मराठ्यांमधील क्रेझ कमी करण्याचा डाव-जरांगे

सांगली: कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर टीकेची झोड उठवणाऱ्या मनोज जरांगे यांनी एक मोठी शंका ३व्यक्त केली आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ज्या कुणबी नोंदी सापडल्या, त्या आता रद्द केल्या जात आहेत. त्यातून एकनाथ शिंदे यांची मराठ्यांमध्ये निर्माण झालेली क्रेझ कमी करण्याचा डाव असू शकतो, अशी शंका जरांगे यांन व्यक्त केली आहे. मनोज जरांगे हे राज्यव्यापी दौऱ्यावर असून सांगलीत त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. मनोज जरांगेंच्या आंदोलनानंतर महाराष्ट्रात जुन्या वंशावळी शोधून कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. पण गेल्या काही दिवसात काही मराठा उमेदवारांची प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे समोर आल्यावर मनोज जरांगेंचा चांगलाच पारा चढला. त्यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर जहरी टीका करत ढबल ढोलकी असल्याचा आरोप केला.


# बीड पालिकेत राष्ट्रवादीच्या अकरा सदस्यांचा वेगळा गट

## आ.विजयसिंह पंडित यांचे फोटो हटवले

बीड । प्रतिनिधी

**नगरपालिकेतील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी आता उघडपणे समोर येऊ लागली आहे. सुरुवातीला नगरपालिकेपुरता सुरु असलेला हा वाद आता रस्त्यावरही दिसू लागला आहे. पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या दौऱ्यात या गटबाजीचे दर्शन झाल्यानंतर पक्षाचे १९ पैकी ११ नगरसेवक बंडाच्या तयारीत असल्याचे चित्र आहे. या बंडाचा पहिला टप्पा म्हणून या ११ जणांनी सोशल मीडिया पेजवरून गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांचे फोटो हटवल्याचे समोर आले आहे.**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत



राष्ट्रवादी काँग्रेसने विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली मोठी राजकीय मुसंडी मारली होती. तब्बल ३५ वर्षे क्षीरसागर कुटुंबाचे वर्चस्व असलेल्या पालिकेत सत्तांतर घडवून आणण्यात पंडित यांची भूमिका महत्त्वाची ठरली होती. मात्र, सत्ता स्थापन होऊन सात महिनेही ▶▶ पान २ वर

# पैसे अपूर्ण मिळाले म्हणून खरेदीखत अवैध ठरत नाही!

## सर्वोच्च न्यायालयाचा मालमत्ता हस्तांतरणावर मोठा निर्णय

दिल्ली । वृत्तसंस्था

'एखाद्या मालमत्तेच्या विक्रीसाठी खरेदीखत नोंदवले जाते, तेव्हा विक्रीच्या किमतीचा काही भागच दिला गेला असला तरीही, त्याचे मालकी हक्क खरेदीदाराकडे जातात. विक्रीच्या किमतीचा उर्वरित भाग न मिळाल्याने खरेदीखत अवैध ठरत नाही; अशा वेळी उर्वरित रक्कम वसूल करणे हाच उपाय असतो, केवळ उर्वरित रक्कम मिळाली नाही म्हणून खरेदीखत रद्द करणे हा उपाय नाही,'' असे निरीक्षण नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला




आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने नोंदवले.

दोन मालमता खरेदीसाठी प्रत्येकी ७,००० रुपये इतकी रक्कम निश्चित करण्यात आली होती. नोंदणीवेळी २,५०० रुपये देण्यात आले होते. ४,५०५ रुपये ही रक्कम मूळ मालकाची वित्तीय संस्था आणि सरकारी विभागांतील थकबाकी भरण्यासाठी ▶▶ पान २ वर

### उच्च न्यायालयाचा निकाल रद्द

उच्च न्यायालयाचा तो निकाल रद्द करत सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचा निर्णय बहाल केला. खंडपीठाने स्पष्ट केले की, अंशतः मोबदला मिळाल्याची पूर्ण कल्पना असताना झालेले खरेदीखत, केवळ उर्वरित रक्कम न मिळाल्याच्या कारणास्तव रद्दबातल ठरत नाही. वादींना उर्वरित रक्कम व्याजासह वसूल करण्याचा अधिकार आहे. प्रतिवादींनी इच्छित असल्यास उर्वरित रक्कम व्याजासह देऊन मालमत्तेचा ताबा मागणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करत ताबा कायम ठेवण्याच्या कनिष्ठ न्यायालयांच्या निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कोणताही हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

# कुंभमेळ्याच्या नावाखाली शेकडो कोटींचा गंडा?

## बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांकडून पैसे उकळले-गिरीश महाजन

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नावाखाली राज्यातील ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कुंभमेळ्याच्या कामांसाठी कोणतेही ऑफलाइन टेंडर काढलेले नसतानाही नाशिक महापालिका आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त श्री. सिंग यांच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांकडून पैसे उकळण्यात आल्याचा आरोप आहे. या बनावट आदेशांद्वारे तब्बल ४०० ते ५०० कोटी रुपयांच्या कामांचे वाटप केल्याचा दावा करण्यात आला आहे. फसवणूक झाल्याचा आरोप केलेल्या काही ठेकेदारांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेऊन तक्रार केली. ▶▶ पान २ वर



# विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईवर शाह उत्तर देणार!

## विरोधकांनी त्यांच्या उत्तरात अडथळे आणू नये-किरेन रिजिजू



दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्लीतील जंतरमंतर येथे कॉकरोच जनता पार्टी प्रणित संघटनेच्यावतीने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर २० जुलै रोजी दिल्ली पोलीसांनी कारवाई करत विद्यार्थ्यांच्यावर लाठी चार्ज करत विद्यार्थ्यांच्या विरोधात पॅलेट गनचा वापर केल्याने अनेक विद्यार्थी जखमी झाले, तर बिहारमध्ये एके-४७ रायफलचा कारवाई दरम्यान वापर करत जवळपास ९ राऊड विद्यार्थ्यांच्या विरोधात फायर करण्यात आल्या. या कारवाईवरून संसदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवेदनाची मागणी विरोधी पक्षांनी केली. तसेच या मागणीवरून संसद ठप्प केली. तर दुसऱ्याबाजूला विरोधकांच्या मागणीला प्रतिसाद ▶▶ पान २ वर

# झारखंडमध्येही विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज!

## काटेरी तारांचे कुंपण भेदून विधानसभेकडे कूच, राहुल गांधींकडून निषेध



रांची । वृत्तसंस्था

दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर आणि त्या आंदोलनाला मोठे यश आल्यानंतर आता देशात अनेक ठिकाणी विद्यार्थी शिक्षणव्यवस्थेविरोधात आवाज उठवू लागले आहेत. अशातच आता गेल्या आठवड्याभरापासून झारखंड राज्यातील रांचीमध्ये स्पर्धा ▶▶ पान २ वर

### माजी अध्यक्षांना अटक

झारखंडमधील विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांच्या विरोधात विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या विधानसभा घेराव आंदोलनादरम्यान हेमंत सोरेन सरकारने मोठी कारवाई केली आहे. याप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाने झारखंड लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष एल. ख्यांग्ते यांना अटक केली आहे. या प्रकरणातील सीआयडीची ही २० वी अटक असून, यापूर्वी उपपर४ीक्षा नियंत्रकासह १९ जणांना गजाआड करण्यात आले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३१.५० क्विंटल | २,५०० | २,९२१ | २,६५४ |
| ज्वारी/हायब्रिड: ११६.०० क्विंटल | २,४१० | ४,८७६ | २,८९६ |
| मका/लोकल: १०.०० क्विंटल | २,४३५ | २,४३५ | २,४३५ |
| तूर : २.०० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १०२.५० क्विंटल | २,३०० | २,९०१ | २,५८५ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,००० | ५,९६१ | ५,४८० |

# 52 कुळेची 96 कुळेकडून पडताळणी

## मनोज जरांगे यांच्याकडून मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्यासह सरकारवर तोंडसुख

बीड-पुणे । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाचे हत्यार पुन्हा एकदा जरांगे पाटील यांनी उपसले असून मागील काळात झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती महानगरपालिका निवडणुकीत अनेकांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर जरांगे पाटील यांचा परा चढला असून, त्यांनी थेट मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सरकारवर चांगलेच तोंडसुख घेतले. सध्या महसूल मंत्री बावनकुळे रडारवर आहेत. त्यांच्याविरुद्ध मराठा समाजात रोष निर्माण होत आहे यावरून बावनकुळे यांचे ९६ कुळी कडून पडताळणीस सुरू आहे, असे बोलले जात आहे.**




राज्यभरात मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू केला आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी राज्य सरकारवर, विशेषतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री महोदयांवर अत्यंत आक्रमक शब्दांत टीकास्त्र सोडले आहे. त्यांच्या या विधानांमुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणांमध्ये सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली आहे. ५२ कुळे आणि ▶▶ पान २ वर

### आता सरकारची भूमिका काय असणार?

जरांगे पाटील यांच्याकडे येणारी माहिती कितपत अचूक किंवा चुकीची आहे, याबद्दल साशंकता असली तरी त्यांच्या या आक्रमक भूमिकेने प्रशासनाची झोप उडवली आहे. मराठा आरक्षणाचा हा तिढा सोडवण्यासाठी आणि जरांगे यांच्या वाढत्या आक्रमकतेला प्रत्युत्तर देण्यासाठी आता राज्य सरकार नेमकी काय भूमिका घेणार? आणि महायुती सरकार यावर काय तोडगा काढणार? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

फोकस...



# राम मंदिर प्रकरणी १७ ऑगस्टला सुनावणी

दिल्ली । वृत्तसंस्था

**अयोध्येतील राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी न्यायालयाच्या देखरेखीखाली एसआयटी चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकांवर १७ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी निश्चित करण्यात आली आहे.**

ही सुनावणी सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुरू आहे. तत्पूर्वी, या याचिकांवरील सुनावणी पुढे ढकलण्याच्या उत्तर प्रदेश सरकारच्या वकिलाची विनंती मान्य केली. दरम्यान, २७ जुलै रोजी या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी आयजीपी ▶▶ पान २ वर

cmyk



अग्रलेख

# विद्यार्थ्यांचा सीजेआयंनाच विरोध!

एनएएलएसएआर च्या ४५० विद्यार्थ्यांचा सवाल छोटा नाही; प्रश्न एका व्यक्तीचा नसून संविधान, न्यायालय आणि सत्तेच्या समीकरणांचा आहे. न्यायालयात न्याय मिळतो की नाही, हा प्रश्न सामान्य माणूस विचारतो तेव्हा त्याला अनेकदा 'प्रक्रिया सुरु आहे' असे सांगितले जाते. पण जेव्हा कायद्याचे विद्यार्थीच देशाच्या सरन्यायाधीशांच्या उपस्थितीवर प्रश्नचिन्ह उभे करतात, तेव्हा त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून पुढे जाता येत नाही.

हैदराबादमधील एनएएलएसएआर विद्यापीठातील ४५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत यांना आगामी दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्याच्या निर्णयाला विरोध केला आहे. हा केवळ एका निमंत्रणाचा वाद नाही. हा न्यायव्यवस्थेबद्दल तरुण पिढीच्या मनात निर्माण होत असलेल्या प्रश्नांचा राजकीय आणि घटनात्मक आरसा आहे. आणि म्हणूनच आता सरळ प्रश्न विचारला पाहिजे, देशातील सर्वोच्च न्यायिक पदावर असलेल्या व्यक्तीला कायद्याचे विद्यार्थीच प्रश्न विचारत असतील, तर या अस्वस्थतेचे कारण काय? विद्यार्थी चुकीचे आहेत की त्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याची व्यवस्था तयार नाही की प्रश्न विचारणारी नवी पिढीच आता कोणत्याही घटनात्मक पदाला 'अस्पृश्य' मानायला तयार नाही.? यातील तिसरा पर्याय सत्तेला आणि संस्थांना सर्वाधिक अस्वस्थ करणारा ठरू शकतो. कारण आजचा विद्यार्थी कालचा मतदार नाही. तो संविधान वाचतो. तो न्यायालयीन निर्णय वाचतो. तो सुनावण्यांचे वृत्त पाहतो. तो पोलिस कारवाईचे व्हिडिओ पाहतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो प्रश्न विचारतो. जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पोलिस कारवाईचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला. २२ जुलै रोजी या प्रकरणाच्या तातडीच्या सुनावणीची मागणी झाली. आंदोलनातील पोलिस कारवाईचे व्हिडिओ न्यायालयासमोर दाखवण्याचा प्रयत्न झाला आणि त्यावेळी व्हिडिओ पाहण्यासाठी वेळ नसल्याच्या आशयाची टिप्पणी झाल्याचे वृत्त आले. आता कल्पना करा, एखादा विद्यार्थी पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोप करतो. तो पुरावा म्हणून व्हिडिओ घेऊन न्यायालयात जातो आणि त्याला जर न्यायालयीन प्रक्रियेत तातडीची संवेदनशीलता जाणवली नाही, तर त्याच्या मनात प्रश्न निर्माण होणार नाहीत तर काय होणार? न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्याला न्यायालयाच्या दारातच 'आमच्याकडे वेळ नाही' असा संदेश गेला तर न्यायव्यवस्थेवरील त्याचा विश्वास कसा टिकणार? होय, नंतरच्या सुनावण्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकाराबाबत महत्त्वाची भूमिका घेतली. पोलिसांकडून अतिरेक होऊ नये, असे निर्देश देण्यात आले. आंदोलनकर्त्यांच्या अधिकाराबाबत न्यायालयाने हस्तक्षेपही केला. पण प्रश्न हा आहे, पहिल्या प्रतिक्रियेचा परिणाम काय झाला? कारण न्यायालयीन संस्थांमध्ये केवळ अंतिम आदेश महत्त्वाचा नसतो; न्याय मिळत असल्याची भावना निर्माण करणारी संपूर्ण प्रक्रिया महत्त्वाची असते. या प्रकरणात थेट राजकीय कटाचा आरोप करण्यासाठी पुरावे आहेत, असे म्हणता येणार नाही. पण राजकीय प्रश्न विचारण्यास कोणतीही मनाई नाही. आज देशातील तरुण न्यायव्यवस्थेकडे कोणत्या नजरेने पाहत आहेत? घटनात्मक संस्थांवर त्यांचा विश्वास वाढतो आहे की कमी होतो आहे आणि या अस्वस्थतेचा राजकीय फायदा कोण घेणार? कारण राजकारणात रिकामी जागा कधीच रिकामी राहत नाही. संस्थांवरचा विश्वास कमी झाला की राजकीय शक्ती त्या अविश्वासाला आपल्या सोयीच्या कथनात बदलतात. एक गट म्हणतो, न्यायालय सरकारच्या बाजूने आहे. दुसरा म्हणतो न्यायालय विरोधकांच्या बाजूने आहे. तिसरा म्हणतो न्यायव्यवस्था जनतेपासून दूर गेली आहे आणि अशा आरोप-प्रत्यारोपांच्या वातावरणात सर्वाधिक नुकसान होते ते संस्थेच्या विश्वासार्हतेचे. इथे राजकीय नेतृत्वालाही प्रश्न विचारला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थी आंदोलनाला राजकीय कट' म्हणणे सोपे आहे. प्रत्येक विरोधामागे एखादा पक्ष शोधणे सोपे आहे. प्रत्येक असहमतीला देशविरोधी ठरवणे त्याहून सोपे आहे. पण एकदा का तरुण पिढीला वाटू लागले की, ''प्रश्न विचारला तर आम्हालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाईल,'' तर ही परिस्थिती कोणासाठीही चांगली नाही. कारण उद्या सत्ता बदलू शकते. आज ज्यांना आंदोलनकर्त्यांचा आवाज त्रासदायक वाटतो, ते उद्या विरोधात असू शकतात. आज ज्यांना न्यायालयावर टीका करणे सोयीचे वाटते, त्यांनाच उद्या न्यायालयाकडून संरक्षण मागावे लागू शकते. संविधान कोणत्याही पक्षाची खासगी मालमत्ता नाही. न्यायालय कोणत्याही सरकारचे विभागीय कार्यालय नाही आणि नागरिकांचा प्रश्न विचारण्याचा अधिकार कोणत्याही सत्तेची देणगी नाही. टीका म्हणजे न्यायव्यवस्थेविरोधात युद्ध नव्हे. हा फरक जाणीवपूर्वक पुसण्याचा प्रयत्न झाला, तर लोकशाही धोक्यात येते. न्यायाधीशांच्या निर्णयावर टीका करणे म्हणजे न्यायालयाचा अवमान नाही. न्यायालयीन प्रक्रियेवर प्रश्न विचारणे म्हणजे न्यायव्यवस्थेचा नाश करणे नाही. आणि सरन्यायाधीशांच्या भूमिकेबद्दल असहमती व्यक्त करणे म्हणजे संविधानाचा अपमान नाही. उलट, संविधान नागरिकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार देते. मग कायद्याचे विद्यार्थी हा अधिकार वापरत असतील तर त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी त्यांना 'न्यायव्यवस्थेविरोधी' ठरवायचे का? खरा धोका विद्यार्थ्यांच्या प्रश्नात नाही; प्रश्न दाबण्याच्या मानसिकतेत आहे. लोकशाहीत असहमती असणारच. सरकारवर टीका होईल. संसदेवर टीका होईल. माध्यमांवर टीका होईल. न्यायालयावरही टीका होईल. प्रश्न असा नाही की टीका का होते. प्रश्न असा आहे की टीका झाल्यानंतर संस्था अधिक मजबूत होतात की अधिक असहिष्णू? विद्यार्थ्यांचा विरोध हा त्यामुळे एका दीक्षांत समारंभाच्या प्रोटोकॉलपेक्षा मोठा विषय आहे. तो भविष्यातील वकिलांचा, न्यायाधीशांचा आणि संविधानिक संस्थांशी व्यवहार करणाऱ्या पिढीचा मानसिक नकाशा दाखवतो. ही पिढी प्रश्न विचारणार आहे. तिला केवळ आदेश नकोत. तिला स्पष्टीकरण हवे आहे. तिला संविधानातील अधिकार पुस्तकातच नाही, तर प्रत्यक्ष आयुष्यातही दिसायला हवेत. आजचा प्रश्न सीजेआयंचा नाही, संस्थेच्या विश्वासाचा आहे. सूर्यकांत व्यक्तिशः योग्य आहेत की अयोग्य, हा प्रश्न या अग्रलेखाचा केंद्रबिंदू नाही. कारण व्यक्ती येतात आणि जातात. पदांवर बदल होतात. पण संस्था टिकल्या पाहिजेत. आणि संस्था टिकण्यासाठी त्यांच्यावर प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांची गरज असते. म्हणून एनएएलएसएआर च्या विद्यार्थ्यांना एक प्रश्न विचारण्याआधी आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे''

जर ४५० हून अधिक कायद्याचे विद्यार्थी देशाच्या सरन्यायाधीशांच्या उपस्थितीवर प्रश्नचिन्ह उभे करत असतील, तर आपण त्यांना गप्प करण्याचा प्रयत्न करणार आहोत की त्यांच्या प्रश्नांमुळे आपल्या संस्थांमध्ये कुठे तरी दुरावा निर्माण झाला आहे का, याचा आत्मपरीक्षण करणार आहोत? कारण लोकशाहीला सर्वात मोठा धोका विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून नसतो. धोका तेव्हा निर्माण होतो, जेव्हा समाजाला प्रश्न विचारण्याची सवयच उरत नाही. जेव्हा असहमतीला देशद्रोह म्हटले जाते. जेव्हा टीकेला अवमान म्हटले जाते. जेव्हा न्यायालयावर प्रश्न विचारणे पाप मानले जाते आणि जेव्हा संविधानापेक्षा पद मोठे मानले जाते, तेव्हा लोकशाहीचा कणा वाकायला सुरुवात होते. म्हणून एनएएलएसएआरचा हा आवाज ऐकला पाहिजे. त्यांच्याशी सहमत होणे बंधनकारक नाही. त्यांच्या प्रत्येक आरोपाला सत्य मानणेही आवश्यक नाही. पण त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे, हे मान्य करावेच लागेल. कारण शेवटी सरन्यायाधीश बदलतील. सरकारे बदलतील. पक्ष बदलतील. सत्ता बदलेल, पण संविधान राहिले पाहिजे. न्यायव्यवस्था राहिली पाहिजे. आणि त्याहून महत्त्वाचे न्यायव्यवस्थेलाही प्रश्न विचारण्याचे धाडस असलेली लोकशाही जिवंत राहिली पाहिजे. कारण न्यायालयाची प्रतिष्ठा प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे कमी होत नाही; त्या प्रश्नांना उत्तर देण्याची क्षमता हरवली, तरच ती प्रतिष्ठा धोक्यात येते.

# जालन्यात ४१ घातक शस्त्रांचा साठा जप्त; चंदनझिरा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## २२ तलवारी, १५ खंजीर आणि ४ चॉपर जप्त; दोन रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरात होत असलेले गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने जालना शहरातील अवैध शस्त्रे बाळगणारे गुन्हेगारांचे विरुध्द कडक व धोरणात्मक कारवाई शहरातील गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्या इसमांचे हालचालीवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. त्यादरम्याण पोलीस ठाणे चंदनझिरा जालना येथे नव्याने रुजु झालेले पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेगारी विरुध्द कारवाईचा बडगा उगारुन अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने साठवुन ठवुन ठेवलेली विविध प्रकारची तब्बल ४१ घातक हत्यारे चंदनझिरा पोलीसांनी जप्त करुन मोठी कारवाई केली आहे. सदरील दोन्ही आरोपी विरुद्ध दोन पोलीस स्टेशनमध्ये एका आरोपी विरुद्ध १४ गुन्हे दाखल असून तसेच दुसरे आरोपी विरुद्ध ७ गुन्हे दाखल आहे.**

पोनि किरणे बिडवे यांनी चंदनझिरा पोलीस ठाणेच्या सर्व अधिकारी व अंमलदार यांना चंदनझिरा पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्डवर असलेल्या व शस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांवर लक्ष केंद्रीत करुन त्यांना निगरणाखाली ठेवण्याच्या सुचना केल्या होत्या. पोलीसांनी निगराणीखाली ठेवलेला रेकॉर्डवरील गुन्हेगार शेख माजेद शेख लतिफ वय २३ वर्षे रा. राबीया मशीदच्या



मागे, डायमंड हॉल जवळ सुंदरनगर चंदनझिरा हा संशयास्पद हालचाली करीत असल्याचे दिसुन आले होते. त्यावरुन चंदनझिरा पोलीसांनी खबऱ्यामार्फत त्याचे बाबत सखोल माहीती घेवुन पाठपुरावा केला असता शेख माजेद शेख लतिफ हा त्याचे राहते घरामध्ये धारदार तलवारी, खंजीर व चॉपर बाळगुन असुन, तो जालना शहरामध्ये अवैध गंभीर कृत्य करण्यासाठी तसेच दहशत पसरवीण्याचे उद्देशाने लोकांना विक्री करण्याचे बेतात असल्याची माहीती प्राप्त झाली. मिळालेल्या माहीतीची खात्री करुन दिनांक ०९/०८/२०२६ रोजी पोनि किरणे बिडवे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांचे सुचना व मार्गदर्शना प्रमाणे पथकासह सुंदरनगर परीसरातील शेख माजेद शेख लतिफ याचे घरावर छापा मारुन झडती घेतली असता त्याचे घरात अवैधपणे व गुन्हेगारी कृत्यासाठी, जनमानसात दहशत पसरवीण्यासाठी लोकांना विक्री करण्याची साठा करुन ठेवलेल्या २२ धारदार तलवारी, १५ धारदार खंजीर, ४ धारदार चॉपर असे एकुण ४१ घातक हत्यारे ज्याची किंमत सुमारे १ लक्ष ३४ हजार रुपयांचे जप्त करण्यात आले आहेत. या गंभीर गुन्हयात सहभागी असलेला शेख माजेद याचा साथीदार इम्राण ऊर्फ इम्मा सलीम शेख रा. इंदीरा नगर जालना याचा पोलीस शोध घेत आहेत. शेख माजेद शेख लतिफ यास अटक करण्यात आली असुन त्याची दिनांक १२/०८/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली आहे. त्याने हत्यारे कोठुन व कोणाकडुन आणली, कोणा कोणाला विक्री केली याबाबत सखोल तपास सुरु असुन लवकरच आणखी सखोल माहीती उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदर गुन्हयामध्ये सहभागी असलेले शेख माजेद शेख लतिफ व त्याचा साथीदार इम्राण ऊर्फ इम्मा सलीम शेख रा. इंदीरा नगर जालना हे दोघेही रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द जालना शहरातील विविध पोलीस ठाणेला खुन, खुनाचा प्रयत्न, मारामारी, गंभीर दुखापत, दंगा, अवैधपणे शस्त्र बाळगणे अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. गुन्हयातील आरोपी हे गुन्हे करतांना संघटीतपणे एकत्र येवुन गुन्हे करत असल्याने त्यांचे विरुध्द भारतीय न्याय संहीता चे कलम १११ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. सदरील कारवाई पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोउपनि रवि देशमाने, सफौ / राजेंद्र ठाकुर, यांच्यासह पोलीस पथकांनी कारवाई केली

# अंबाजोगाईत कुंटनखान्यावर पोलिसांचा छापा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**सेलू रोड परिसरातील एका अपार्टमेन्टमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर कुंटनखान्यावर पोलिसांनी छापा मारून हायप्रोफाईल सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला. यावेळी दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली, तर त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या आंटीला ताब्यात घेऊन तिच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला.**



परभणी जिल्ह्यातील डेबेवाडी येथील रहिवासी आणि सध्या अंबाजोगाईत राहणारी शिवकन्या नवनाथ फड ही आंटी बाहेरच्या शहरातून महिला आणून त्यांचाकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून अंबाजोगाई शहर पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा होताच पोलिसांनी सेलू रोडवरील पिताजी सारडा नगरीतील अपार्टमेन्टमधील फ्लॅट नंबर डी-फोर मधील कुंटनखान्यावर छापा मारण्यासाठी तात्काळ कारवाईचे नियोजन केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने पंचांना बोलावून पोलीस पथकाने बनावट ग्राहक तयार केला. डमी ग्राहकाकडे पाचशे रुपयांच्या दोन नोटा देऊन त्याला संबंधित फ्लॅटवर पाठवण्यात आले. साध्या वेशातील पोलिसांनी अपार्टमेन्टच्या सर्व बाजूंनी घेराबंदी केली. डमी ग्राहकाने फ्लॅटमध्ये प्रवेश करून व्यवहार निश्चित केला आणि खिडकीतून बाहेर तैनात असलेल्या पोलिसांना ठरल्याप्रमाणे इशारा केला. इशारा मिळताच पोलीस पथकाने तात्काळ फ्लॅटचा दरवाजा वाजवून आत प्रवेश केला. पाहणीदरम्यान एका खोलीत पीडित महिला आणि डमी ग्राहक आढळून आले, तर दुसऱ्या खोलीत वेश्या व्यवसाय चालवणारी महिला चालक उपस्थित होती. पोलिसांनी घटनास्थळावरून डमी ग्राहकाला दिलेल्या नोटा आणि आक्षेपार्ह साहित्य जप्त केले. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक आनंद शंकर शिंदे यांनी सरकारतर्फे तक्रार दिली आहे. त्यानुसार शिवकन्या फड (वय ४०) हिच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलिसांनी तिला ताब्यात घेतले आहे.ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सहा. पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस उपनिरीक्षक सुतळे, पोलीस अंमलदार वडकर, चादर, कांबळे, हारळे आणि महिला पोलीस अंमलदार पाचपिंडे व जाधव यांच्या पथकाने केली. पोलीस निरीक्षक जोगदंड पुढील तपास करत आहेत.

# पान १ वरून...

## २३ जिल्ह्यांत शेतकरी

पीक विम्याचे जे ट्रिगर काढून टाकले आहेत. तो मुद्दाही उठवण्यात आला. वन, देवस्थान, गायरान जमिनींचे मुद्देदेखील आज मोठ्या प्रमाणात उचलण्यात आले. या मुद्यांची सरकारने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. सरकारने जर याची दखल घेतली नाही तर पुढील १० दिवसांमध्ये प्रचंड मोठी तयारी महाराष्ट्रातील शेतकरी करतील. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या इंदापूर येथील निवासस्थानाकडे आम्ही कूच करणार आहोत. जंतर-मंतरवरील आंदोलनाची पुनरावृत्ती करण्याची पूर्ण तयारी आम्ही ठेवली आहे. नियमित कर्जदारांचा, पीक विमाधारकांचा आणि वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनी जे शेतकरी कसतात; त्यांचा प्रश्न घेऊन आम्ही बेमुदत आंदोलनाला बसणार आहोत. जोपर्यंत प्रश्न सुटत नाही तोपर्यंत हजारो शेतकरी कृषिमंत्र्यांच्या दारात बसून महामुक्काम आंदोलन करतील. सरकारने आमच्यावर ती वेळ देऊ नये. जर सरकारने ही वेळ आमच्यावर आणली तर जबरदस्त अशा प्रकारचे अभूतपूर्व आंदोलन महाराष्ट्रात होईल असा इशारा आज २१ जिल्ह्यांतून देण्यात आला, असे नवले यांनी सांगितले. राज्यभर झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व डॉ. अजित नवले यांच्यासह डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, उमेश देशमुख, आमदार विनोद निकोले, किरण गहला, इरफान शेख, सुभाष चौधरी, उद्धव पौळ, अजय बुरांडे, डॉ. अमोल वाघमारे, सदाशिव साबळे, यशवंत झाडे, अर्जुन आडे, शंकर सिडाम, कुमार मोहरमपुरी, माणिक अवघडे आदींनी केले.

--------------

## पैसे अपूर्ण मिळाले म्हणून खरेदीखत

राखून ठेवण्यात आली होती. यावरुन मूळ मालकाने खरेदीखत रद्दबातल घोषित करण्यासाठी व मालकी हक्क मिळवण्यासाठी दावा दाखल केला होता. दिवाणी न्यायालय आणि प्रथम अपील न्यायालयाने विक्री करणार्याचा मालकाचा दावा फेटाळला होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने द्वितीय अपील अर्जात कनिष्ठ न्यायालयांचे निष्कर्ष बाजूला ठेवून खरेदीखतावर आक्षेप घेतला होता. या निकालास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यामूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यामूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, ''जेव्हा खरेदीखताची नोंदणी होते, तेव्हा अंशतः मोबदला दिला असला तरीही मालमत्तेची मालकी हस्तांतरित होते. उर्वरित रक्कम न मिळाल्याने खरेदीखत बेकायदेशीर किंवा अमान्य ठरत नाही. अशा प्रकरणात उर्वरित रकमेच्या वसुलीसाठी दावा करता येतो, मात्र खरेदीखत रद्द करण्याची मागणी करता येत नाही.''

------------

## बीड पालिकेत राष्ट्रवादीच्या

पूर्ण होत नाहीत तोच पक्षातील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांच्यातील वादाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीतील गटबाजी यापूर्वीच समोर आली होती. नाराज नगरसेवकांच्या गटासोबत पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी आपल्या बीड दौऱ्यात चर्चा केली. निधी बाबतची त्यांची नाराजी दूर केली जाईल, असे आश्वासनही दिले. पण हे नगरसेवक काही ऐकायला तयार नाहीत. या नगरसेवकांची नाराजी थेट आमदार विजयसिंह पंडित यांच्याबाबतच दिसते. या नाराजीचे पडसाद थेट सोशल मीडियावर उमटले आहेत. राष्ट्रवादीच्या १९ नगरसेवकांपैकी ११ नगरसेवकांनी एकाचवेळी विजयसिंह पंडित यांचे फोटो आपल्या सोशल मीडिया पेजवरून हटवल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. हा केवळ सोशल मीडिया बदल आहे की पंडित यांच्या नेतृत्वाविरोधातील नाराजीचे संकेत आहेत, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

----------

## कुंभमेळ्याच्या नावाखाली शेकडो

त्यानंतर या प्रकरणातील कथित 'जामनेर कनेक्शन' समोर आले असून, महाजन यांनी संबंधित पोलीस व प्रशासकीय यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, नाशिक कुंभमेळ्याच्या नावाने जामनेर तालुक्यातील दोन, जळगावमधील एक आणि धुळ्याशी संबंधित एका व्यक्तीने बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांना दिल्याची माहिती समोर आली आहे. या माध्यमातून ठेकेदारांकडून पैसे घेतल्याचेही तक्रारदारांनी सांगितल्याचे महाजन यांनी स्पष्ट केले. मात्र, नेमकी किती रक्कम कोणाकडून घेण्यात आली, याबाबत ठेकेदार अद्याप स्पष्टपणे बोलण्यास तयार नसल्याचे त्यांनी सांगितले. पैसे परत देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र पैसे परत न मिळाल्याने संबंधित ठेकेदारांनी अखेर आपल्याकडे तक्रार केली आणि बनावट वर्क ऑर्डरही सादर केल्याचे महाजन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या कथित फसवणुकीत ठेकेदारांना कोट्यवधी रुपयांच्या कामांच्या बनावट वर्क ऑर्डर देण्यात आल्याचा आरोप आहे. काही प्रकरणांत ठेकेदारांकडून रोख रक्कम तसेच धनादेश स्वीकारण्यात आल्याचेही समोर आले आहे. विशेष म्हणजे, या वर्क ऑर्डरवर शासनाच्या नियमानुसार आवश्यक असलेला क्यूआर कोड नसल्याचे काही ठेकेदारांच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांना या कागदपत्रांबाबत संशय निर्माण झाला. त्यानंतर त्यांनी संबंधित यंत्रणांकडे चौकशी केली असता कथित बनावटगिरीचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणात आणखी किती ठेकेदारांची फसवणूक झाली आहे आणि त्यांच्याकडून नेमकी किती रक्कम उकळण्यात आली, याचा तपास सुरू आहे. फसवणूक झाल्याचा दावा करणारे ठेकेदारही सध्या समोर येण्यास धजावत नाहीत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, गिरीश महाजन यांनी महत्त्वाचा खुलासा केला. कुंभमेळ्याच्या कामांसाठी शासनाने एकही ऑफलाइन टेंडर काढलेले नसून, सर्व निविदा प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पडली आहे. तसेच नुकतीच पात्र ठेकेदारांची अधिकृत यादीही प्रसिद्ध करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाबाबत मुख्यमंत्री आणि त्यांच्या सचिवांशी चर्चा झाल्याची माहितीही महाजन यांनी दिली. कुंभमेळ्याच्या नावाने अशा किती बनावट वर्क ऑर्डर तयार करून बाजारात फिरवल्या जात आहेत, याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. कुंभमेळ्याच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून ठेकेदारांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर पोलीस कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे महाजन यांनी सांगितले. त्यामुळे आता या कथित रॅकेटमागील सूत्रधार कोण, बनावट वर्क ऑर्डर किती ठेकेदारांना देण्यात आल्या आणि या माध्यमातून किती रक्कम उकळण्यात आली, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच फसवणुकीची नेमकी व्याप्ती आणि संबंधित व्यक्तींची भूमिका स्पष्ट होणार आहे.

-----------

## झारखंडमध्येही विद्यार्थ्यांवर

परीक्षांमध्ये झालेली पेपरफुटी आणि गैरव्यवहाराविरोधात विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. सोमवारी विद्यार्थी आणि शिक्षणासंबंधित इतर मागण्यांसाठी विधानभवनाच्या निघालेल्या विद्यार्थ्यांच्या मोर्चावर मोठे अडथळे निर्माण करण्यात आले. मात्र, विद्यार्थ्यांना रोखण्यात अपयश येत असल्याचे लक्षात आल्यानंतर विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला. जेपीएससी, जेएसएससी यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित अनियमिततेच्या विरोधात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने आक्रमक रुप घेतले आहे. सोमवारी विधानभवनाच्या दिशेने निघालेल्या विद्यार्थी आंदोलकांना थांबवण्यासाठी पोलिसांनी विविध ठिकाणी काटेरी तारांचे अडथळे उभे केले. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक हालचालींवर पाळत ठेवण्यासाठी डोनचाही वापर केला गेला. असे असूनही, विद्यार्थ्यांनी तीन अडथळे ओलांडले आणि जगन्नाथ मंदिराजवळ पोहोचले. मात्र, या ठिकाणी विद्यार्थ्यांना थांबवण्यात आले. ज्यानंतर विद्यार्थ्यांनी रस्त्यांवर बसले. यावेळी वॉटर कॅननसह पोलीसही तैनात होते. त्यापुढे सहाव्या आणि शेवटच्या अडथळ्यापाशी पोहोचल्यावर पोलिसांनी विद्यार्थ्यांवर पाण्याचे फवारे मारले, पण पांगण्याऐवजी आंदोलन करणारे विद्यार्थी नाचू लागले आणि गमछे फडकावू लागले. थोड्याच वेळात पोलिसांनी पाण्याचे फवारे बंद केले. झारखंडमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध बळाचा वापर केल्याबद्दल काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निषेध व्यक्त केला. राहुल गांधी म्हणाले, झारखंडमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध बळाचा वापर करणे चुकीचे आहे. विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार आहे. केवळ संवादातूनच मार्ग निघू शकतो. तसेच, राज्य सरकारने आंदोलकांचे म्हणणे ऐकून घेणे सुरू ठेवावे आणि त्यांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करावे, असे आवाहनही त्यांनी केले. विशेष म्हणजे, झारखंडमधील हेमंत सोरेन सरकारमध्ये काँग्रेसचाही सहभाग आहे.

---------

## विद्यार्थ्यांवरील पोलिस

न देता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे संसदेत मागील दाराने येत आणि त्यांच्य दालनात बसून कामकाज पहात. मात्र संसदेत बसण्याचे टाळत. अखेर संसदीय मंत्री किरेन रिजिजू यांनी सोमवारी सांगितले की, अमित शाह सभागृहात उत्तर देतील, ज्यामुळे पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून सुरू असलेला हा तिढा सुटण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, सरकार केवळ निवेदनासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांशी संबंधित सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चेसाठी तयार आहे, आणि विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्याला उत्तर देईल. सरकार विद्यार्थ्यांशी संबंधित मुद्द्यांवर चर्चेसाठी तयार आहे. आम्ही तयार आहोत आणि विरोधी पक्षाकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या सर्व मुद्द्यांना उत्तर देऊ. गृहमंत्री अमित शाह उत्तर देतील, असे सांगितले. किरेन रिजिजू म्हणाले की, विरोधी पक्षाला चर्चेदरम्यान कामकाजात व्यत्यय न आणण्याचे आणि गृहमंत्र्यांना त्यांचे निवेदन करू देण्याचे आवाहनही केले. किरेन रिजिजू पुढे बोलताना म्हणाले की, माझा विरोधी पक्षाला एकच मुद्दा आहे की, चर्चा आणि उत्तर दिले जात असताना, गृहमंत्री यांचे वक्तव्य रोखण्यासाठी विरोधी पक्षाने अडथळा निर्माण करू नये. त्यांनी गृहमंत्री आणि सरकारचे उत्तर ऐकले पाहिजे. एकदा चर्चा सुरू झाली की, सखोल चर्चा झाली पाहिजे, असे सांगितले. २० जून रोजी सीजेपीच्या बॅनरखाली आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाई प्रमाणाबाहेर होती, असा आरोप विरोधी पक्षाने केला असून, पेलेट गनच्या कथित वापराचा निषेध केला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही कारवाई अमित शाह यांच्या आदेशानुसार करण्यात आल्याचा आरोप केला. गेल्या काही दिवसांपासून लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्षांकडून सातत्यपूर्ण निदर्शने होत असून, खासदार गृहमंत्री अमित शाह यांनी या आरोपांवर उत्तर द्यावे अशी मागणी करत आहेत. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये अमित शाह यांना लक्ष्य करणाऱ्या घोषणाबाजी करण्यात आली, ज्यामुळे कामकाजात वारंवार व्यत्यय येत आहे आणि सभागृहे सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच कामकाज तहकूब करावे लागत आहे. विरोधी पक्षाचे खासदारही संसदेच्या प्रवेशद्वारावर दररोज निदर्शने करत आहेत. सोमवारी सकाळी, काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून, अमित शाह यांना सभागृहात निवेदन देण्याचे निर्देश देण्याची विनंती केली. के सी वेणुगोपाल म्हणाले की, गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीतील तरुण आणि विद्यार्थ्यांवर होणारे पोलीस अत्याचार आणि पेलेट गनच्या वापराबाबत सविस्तर निवेदन देऊन प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. पावसाळी अधिवेशनाचे केवळ चार दिवस शिल्लक असताना, महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना आणि परकीय योगदान (नियमन) कायदा यांसारख्या अनेक महत्त्वाच्या कायदेशीर उपाययोजनांचे भवितव्य सध्याच्या कोंडीमुळे अनिश्चित आहे. दरम्यान, चर्चेसाठी नियोजित असलेल्या ''अत्यंत महत्त्वाच्या'' मुद्द्यांचा हवाला देत, काँग्रेसने लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमधील आपल्या खासदारांना १०, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी आपापल्या सभागृहांमध्ये उपस्थित राहण्यासाठी व्हीप जारी केला आहे. पक्षाने आपल्या इंडिया आघाडीतील मित्रपक्षांनाही त्यांचे खासदार तिन्ही दिवस संसदेत उपस्थित राहतील याची खात्री करण्यास सांगितले आहे.

---------

## राम मंदिर प्रकरणी १७

किरण एस. यांच्या नेतृत्वाखाली चार सदस्यांचे एसआयटी स्थापन केल्याची दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली होती. तसेच चौकशी पथकात फॉरेन्सिक ऑडिटरचाही समावेश करावा, असे निर्देश न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला दिले होते. श्री राम मंदिरातील देणगीच्या रकमेत नेमका किती आणि कसा गैरव्यवहार झाला, याचा शास्त्रीय आणि कायदेशीर पुरावा गोळा करण्यासाठी एसआयटीने विशेष रणनीती आखली आहे. या तपासात आता चार्टर्ड अकाउंटंट्स म्हणजेच फॉरेन्सिक ऑडिट तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. मंदिराच्या सर्व आर्थिक नोंदी, जमा-खर्च आणि बँकेचे व्यवहार यांचे फॉरेन्सिक ऑडिट केले जाणार आहे. यामुळे नेमका देणगी चोरी कशी झाली याची सखोल माहिती समोर येणार आहे.

-------------

## ५२ कुळेची ९६ कुळेकडून

९६ कुळे यांच्या जात पडताळणीच्या मुद्द्यावरून त्यांनी सरकारला धारेवर धरले. संभाजीनगर येथील जात प्रमाणपत्रांच्या संदर्भावरून त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला. तसेच, दौऱ्यादरम्यान त्यांनी महसूल यंत्रणा आणि मंत्र्यांच्या भूमिकेवरही कडक शब्दांत ताशेरे ओढले. जरी त्यांच्या या भाषेवर आणि पातळीवर काही स्तरांतून आक्षेप घेतला जात असला, तरी सध्याच्या राजकीय वातावरणात सरकार त्यांच्या भूमिकेमुळे दबावात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. दुसरीकडे, जरांगे पाटील यांच्या या बेछूट आणि आक्रमक आरोपांमुळे ओबीसी समाजात वेगळीच चर्चा रंगली आहे. मराठा आरक्षणाच्या या संघर्षात सरकारवर डागल्या जाणाऱ्या प्रश्नांमुळे ओबीसी घटक या संपूर्ण राजकीय घडामोडींकडे कुतूहलाने पाहत असून, सध्या सुरू असलेल्या या राजकीय संघर्षामुळे ओबीसी वर्तुळातून एक प्रकारचा आनंद व्यक्त होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६


## थोडक्यात

### भू-आरेखक परीक्षेत मोहम्मद फिरोज पठाणची बाजी; जय जवान विद्यालयाकडून अभिनंदनाचा वर्षाव!

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या भू-आरेखक डिप्लोमा परीक्षेत बीड येथील ची. मोहम्मद फिरोज पठाण याने ६०० पैकी ५६६ गुण मिळवून परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. त्याच्या या उत्कृष्ट



कामगिरीबद्दल जिल्ह्यातून त्याचे कौतुक होत आहे.ची. मोहम्मद फिरोज पठाण याने अत्यंत जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर ६०० पैकी तब्बल ५६६ गुणांची कमाई करत हे सुयश संपादन केले. त्याच्या या मोठ्या यशामुळे त्याचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.आपल्या विद्यालयाच्या या माजी विद्यार्थ्याने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल अरुणा असफअली महिला मंडळ, बीड संस्थेचे अध्यक्ष, सचिव,पदाधिकारी तसेच जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव ता. वडवणी, जि. बीड विद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी, तसेच कवडगाव येथील सर्व प्रतिष्ठित मान्यवर सर्व नागरिक, शिक्षणप्रेमी, पालक वृंद व माजी विद्यार्थी संघ यांच्या वतीने ची. मोहम्मद फिरोज पठाण याचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे. तसेच त्याला भावी वाटचालीस आणि पुढील उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्याच्या या यशामुळे कवडगाव पंचक्रोशी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.*

### शेतकरी आणि माजलगावातील प्रलंबित प्रश्नांसाठी आ.प्रकाश सोळंके यांनी मोर्चा काढावा – तुकाराम नावडकर

माजलगाव । प्रतिनिधी

आमदार प्रकाश सोळंके यांनी राजकीय विषयांवरील मोर्चांपेक्षा माजलगाव मतदारसंघातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी तुकाराम नावडकर यांनी केली आहे.



शेतकऱ्यांचे पीकविमा, कर्जमाफी, अनुदान, शेतीमालाला योग्य भाव, पाणी आणि सिंचनाचे प्रश्न आजही कायम आहेत. त्याचबरोबर अपुऱ्या बससेवा, रस्ते,वीज,पाणी, रोजगार आणि इतर मूलभूत सुविधांचे प्रश्न नागरिकांना भेडसावत आहेत.

आमदार साहेबांनी मोर्चा काढायचाच असेल तर तो शेतकऱ्यांसाठी आणि माजलगावच्या प्रलंबित प्रश्नांसाठी काढावा. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर, संबंधित विभागांवर दबाव आणण्यासाठी मोर्चा काढला तर आम्ही त्याचे स्वागत करू आणि जनतेच्या हितासाठी त्या लढ्यात सहभागी होऊ, असे तुकाराम नावडकर यांनी स्पष्ट केले.केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून संघर्ष करणे हीच लोकप्रतिनिधी म्हणून खरी जबाबदारी आहे, असेही नावडकर यांनी म्हटले.हर्षवर्धन सपकाळ यांनी जनतेच्या प्रश्नांवर घेतलेल्या भूमिकेला आमचा पाठिंबा आहे. मात्र माजलगावच्या जनतेच्या प्रश्नांसाठी आमदार प्रकाश सोळंके यांनीही पुढाकार घेऊन ठोस आंदोलन उभे करावे, हीच आमची अपेक्षा आहे.

# परळी नगर परिषदेच्या नागरी कामकाजात विविध सेवा व योजनांच्या जलद गती माहितीसाठी आता व्हॉट्सप संवाद सुविधा

## नगर परिषदेत 'व्हॉट्सप चॅटबॉट'चा निर्णय; नागरिकांना मिळणार डिजिटल सेवांचा लाभ

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

नागरिकांना नगर परिषदेच्या विविध सेवा व योजनांची माहिती घरबसल्या, जलद आणि सहज उपलब्ध करून देण्यासाठी 'व्हॉट्सप चॅटबॉट' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय परळी वैजनाथ नगर परिषदेच्या स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती बैठक पार पडली. या बैठकीत 'व्हॉट्सप चॅटबॉट' सेवा सुरू करणे ,अभ्यागतांच्या आवक-जावक नोंदीसाठी स्वतंत्र रजिस्टर, नगर परिषद कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र नोंदवही, प्रवेश नियंत्रण व्यवस्था आणि अभ्यागत पास प्रणाली लागू करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.





आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकाभिमुख प्रशासन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या सुविधेमुळे नागरिकांना नगर परिषदेच्या विविध सेवांची माहिती, अर्ज व प्रमाणपत्रांच्या प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, कर व इतर नागरी सेवांबाबत मार्गदर्शन एकाच डिजिटल माध्यमातून मिळणार आहे. याशिवाय नागरिकांना तक्रार नोंदणी, तक्रारीची सद्यस्थिती जाणून घेणे, नगर परिषदेच्या महत्त्वाच्या सूचना तसेच आवश्यक संपर्काची माहिती 'व्हॉट्सप चॅटबॉट'च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे केवळ माहिती घेण्यासाठी अथवा प्राथमिक स्वरूपाच्या कामांसाठी नागरिकांना नगर परिषद कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता कमी होणार असून, वेळ आणि श्रमाची बचत होण्यास मदत होणार आहे.त्याचबरोबर नगर परिषद प्रशासकीय इमारतीच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. अभ्यागतांच्या आवक-जावक नोंदीसाठी स्वतंत्र रजिस्टर, नगर परिषद कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र नोंदवही, प्रवेश नियंत्रण व्यवस्था आणि अभ्यागत पास प्रणाली लागू करण्याबाबत चर्चा झाली. तसेच प्रशासकीय इमारतीतील सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षम करण्यावरही भर देण्यात आला.

स्थायी समितीच्या बैठकीत शहरातील विविध नागरी प्रश्न आणि विकासकामांवर साधक-बाधक चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या सुविधा, सुरक्षितता आणि प्रशासनातील पारदर्शकता यांना प्राधान्य देत विविध सकारात्मक निर्णय घेण्यात आले. डिजिटल नगर परिषद, सुरक्षित प्रशासन आणि नागरिकाभिमुख सेवा या संकल्पनेच्या दिशेने 'व्हॉट्सप चॅटबॉट' चा निर्णय हा परळी नगर परिषदेचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले.

यावेळी रा.कॉ. गटनेते वैजनाथ सोळंके, भाजप गटनेते प्रा. पवन मुंडे, सौ. जयश्री गित्ते, सौ. अंजली माळी, सौ. कविता इंगळे, योगेश मेनकुदळे, कार्यलयीन अधीक्षक संतोष रोडे, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे, सभा व्यवस्थापन विभाग प्रमुख सत्यजित पिटके, बांधकाम विभाग प्रमुख आशिष दीक्षीत आदी उपस्थित होते.

# सरकारने भांडणं लावण्याचं काम करू नये -आनंदराज आंबेडकर

## परळीत उपवर्गीकरण विरोधी महामोर्चास हजारोंची उपस्थिती

परळी । प्रतिनिधी

विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान राष्ट्राला अर्पण करताना या देशातील अनुसूचित जातीला ३४१ कलमानुसार एकत्र ठेवले आहे. महाराष्ट्रात ५९ जाती गुण्यागोविंदाने नांदत असतांना यामध्ये सरकारने जाती-जातीत भांडण लावण्याचा उद्योग करू नये अन्यथा गाठ आमच्याशी आहे असा सज्जड इशारा रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांनी परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात बोलताना सरकारला दिला. तर यावेळी चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी मंत्री बबनराव घोलप यांनी वर्गीकरणाची कुणीही मागणी केलेली नसताना सरकार षडयंत्र



करत असल्याचा आरोप केला.

महाराष्ट्र सरकार महाराष्ट्रात अनुसूचित जातीत असलेल्या आरक्षणात उपवर्गीकरणाच्या नावाखाली फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे राज्य सरकारचा हा प्रयत्न हाणून पाडावा, अनंत बद्दर समिती बरखास्त करावी, तसेच खाजगीकरणात आरक्षण लागू करावे आदी प्रमुख मागण्यासाठी आज दिनांक १० ऑगस्ट रोजी रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक भव्य असा महामोर्चा काढण्यात आला. यावेळी बोलताना सरसेनापती आनंदराज आंबेडकर म्हणाले की, उपवर्गीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रात सर्वत्र मोठमोठे अनुसूचित जातीतील ५९जातींचे मोर्चे निघत आहेत. या मोर्चाचा सरकारवर परिणाम होत आहे.मोर्चे हिवाळी अधिवेशना पर्यंत चालू राहतील.तोपर्यत सरकारने ऐकलं नाही तर अधिवेशनाला घेराव घालू.९०टक्के मातंग समाज सोबत आहे . सरकार अल्पसंख्याक समाजाचे आहे. त्यांना बहुजन एकत्र आले तर याची सरकारला भिती वाटत आहे.म्हणून हा उपवर्गीकरण करण्याचा डाव आखला जात आहे.जन आक्रोशाला शांतपणे आम्ही आमच्या मागणीद्वारे मांडत आहोत.आता पर्यंत आम्ही शांततणे मोर्चे काढत आहोत.दिल्लीत धर्मेंद्र गेला आता देवेंद्र जाईल.समाज जे सोबत नाहीत त्यांना धडा शिकविल असेही ते म्हणाले. तर ॲड.अमन आनंदराज आंबेडकर यांनी आम्ही बाबासाहेबांचे वाघ आहोत.

## पान ६ वरुन...

### हर्षवर्धन सपकाळ

यासाठी हा निषेध करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. यापुढे अशा प्रकारची वक्तव्ये केल्यास पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.या आंदोलनात विधानसभा अध्यक्ष जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, शहराध्यक्ष सय्यद नाजेम,माजी जि प.सभापती कल्याण आबुज,मनोज फरके यांच्यासह राष्ट्रवादी कॉँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. तहसील प्रशासनाला निवेदन देऊन संबंधित वक्तव्याचा निषेध नोंदविण्यात आला.

### चौसाळा बस स्थानकाचे

लोढा यांनी कमालीचे प्रयत्न केले वारंवार बंद असलेले काम त्यांनी प्रयत्न करून पुन्हा सुरू केले सदर हे बांधकाम अचानक बंद पडले आहे संबंधित अधिकाऱ्यांनी सदर बांधकामाच्या प्रकरणी तातडीने लक्ष देऊन बांधकाम चांगल्या दर्जाचे मटेरियल वापरून व त्या बांधकामावर पाणी मारले नसल्याने तातडीने पाण्याची व्यवस्था करण्यात यावी व बांधकाम सुरू करण्यात यावे अशी मागणी होत आहे तर सदर बांधकाम सुरू न झाल्यास चौसाळा ग्रामस्थांना या बांधकामासाठी रस्त्यावर उतरावे लागेल अशी मागणी व इशारा नागरिक करतात

### स्मशानभूमीच्या नोंदीसाठी

या आंदोलना दरम्यान, सरपंच कैलास जाधव, महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी मस्के, ग्राम महसूल अधिकारी गाडे, भूमी अभिलेखचे राख यांच्यासह पोलिस कॉन्स्टेबल पुरुषोत्तम शेप, किशोर गोरे आणि ग्राम पंचायत अधिकारी दत्तात्रय गव्हाणे आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. प्रशासनाच्या वतीने त्यांना योग्य कारवाईचे आश्वासन दिले. यावेळी रोशन सरवदे यांच्यासह त्यांचे समर्थक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### बीडमध्ये सत्यशोधक पुरस्कार

महाराष्ट्र आरंभचे संपादक तथा कार्यक्रमाचे आयोजक दीपक थोरात यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, दीपक थोरात केवळ कार्यक्रम आयोजित करत नाहीत, तर दरवर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम सातत्याने राबवतात. गेल्या वर्षी मला या कार्यक्रमाचे निमंत्रण होते; मात्र काही अडचणीमुळे मी उपस्थित राहू शकलो नाही. यावर्षी दीपक थोरात यांनी निमंत्रण दिल्याच्या दिवशीच कुठल्याही परिस्थितीत या कार्यक्रमाला उपस्थित राहायचे, असे ठरवले होते. समाजाच्या अडीअडचणीच्या वेळी दीपक थोरात कधीच मागे हटत नाहीत. कोणालाही गरज पडली तर ते कायम उभे असतात. शिवछत्र परिवाराचा सदस्य म्हणून या उपक्रमाला शुभेच्छा देत भविष्यात दीपक थोरात यांच्या सोबत सर्व ताकदीने उभे राहा, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनीही दीपक थोरात यांच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, दीपक थोरात यांचे कार्य मी अनेक वर्षांपासून पाहत आहे. त्याची प्रचिती माझ्यापेक्षा माझे वडील डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांना अधिक होती. त्यांच्या माध्यमातूनच माझी दीपक थोरात यांच्याशी ओळख झाली. त्यानंतर विविध उपक्रमांमध्ये त्यांच्यासोबत सहभागी होत आलो असून, आमचे संबंध लहान-मोठ्या भावासारखे आहेत. दैनिक आरंभमधून कधी कधी एखादी चमत्कारिक बातमी येते; मात्र त्याबाबत आमच्यात कधीही कटुता निर्माण झाली नाही. त्यांनी चांगले काम केले आहे. विशेषतः सिव्हिल हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी ते मदत करतात आणि रुग्णांची लूटमार होऊ नये यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. असा कार्यक्रम घेणे सोपे नाही. अत्यंत उत्कृष्ट कार्यक्रम त्यांनी आयोजित केला असून, त्याबद्दल दीपक थोरात यांचे अभिनंदन आणि कौतुक करतो, असे त्यांनी सांगितले. या सोहळ्यात समाजभूषण भीमराव नाडे, सुमित भारस्कर, शेख सय्यद, डॉ. नागेश चव्हाण, प्रा. प्रदीप रोडे, जावेद कुरेशी, डॉ. निशा बंडू लोखंडे आणि विश्वजीत अंकुटे यांचा सत्यशोधक पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सर्वसामान्य कुटुंबातून जीएसटी आयुक्त पदापर्यंत मजल मारणारे भीमराव नाडे, आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे बीड जिल्हा रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण, मागासवर्गीय समाजातून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्रा. प्रदीप रोडे तसेच ऊसतोड मजुराच्या कुटुंबातून एमबीबीएस, एमडीपर्यंत शिक्षण घेतलेल्या डॉ. निशा बंडू लोखंडे यांच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला. सामाजिक क्षेत्रात सर्व समाजघटकांना सोबत घेऊन कार्य करणारे युवा नेते जावेदभाई कुरेशी यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला वसंत मुंडे, शिवसेना बीड जिल्हाध्यक्ष सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले, भागवत तावर, माजलगाव नगर परिषद सदस्य मुजम्मीलभैय्या पटेल यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याची सुरुवात २००८ पासून करण्यात आली असून, गेल्या अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या माध्यमातून सन्मान केला जात आहे.

तब्येत अचानक बिघडल्याने आ.धनंजय मुंडे कार्यक्रमाला येऊ शकले नाहीतसत्यशोधक पुरस्कार सोहळ्यास माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती निश्चित होती. मात्र, कार्यक्रमाच्या दिवशी अचानक त्यांची तब्येत बिघडल्याने त्यांना कार्यक्रमाला उपस्थित राहता आले नाही. धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीची समाज बांधवांसह आयोजकांना मोठी अपेक्षा होती. त्यांच्या अनुपस्थितीमुळे उपस्थितांमध्ये चर्चा झाली; मात्र त्यांच्या प्रकृतीच्या कारणामुळे कार्यक्रमाला येता न आल्याचे समोर आले. दरम्यान, त्यांच्या अनुपस्थितीत मान्यवरांच्या उपस्थितीत सत्यशोधक पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला.

# क्रांतीदिनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा गीत जागर

बीड । प्रतिनिधी

क्रांतिदिनी,९ ऑगस्ट,१९८९ रोजी शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांचे पुढाकाराने स्थापित 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'च्या बीड शाखेने शहराच्या मध्यवर्ती भागात, महात्मा ज्योतिबा फुले- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्या शेजारी संघटनेचे पदाधिकारी,समविचारी पक्ष-संघटनेचे प्रमुख,सामाजिक कार्यकर्ते यांनी जनजागृतीचे ,उदबोधक,स्फूर्तीदायी अशी 'चळवळीची गाणी' सामुदायिकपणे गात 'जन जागर अभियान' राबविले.





यासंबंधी अधिक तपशील : प्रथम विवेक वाहिनीच्या राज्य कार्यवाह प्राचार्य डॉ सविता शेटे,कॉ नामदेव चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य कॉ डी जी तांदळे, शाखा कार्या ध्यक्ष प्रा विजय घेवारे,शुभांगी कुलकर्णी,नितीन जायभाये,संपादक शेखर कुमार,कौशल्या बावणे यांनी कृतिशील समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

डॉ सविता शेटे, कॉ नामदेव चव्हाण, कॉ डी जी तांदळे, शेखर कुमार यांनी वर्तमानात बोकाळलेली भोंदूगिरी, भ्रामक फलज्योतिष्य, अन कर्मकांडामुळे जनतेचे चालू असलेले सर्व प्रकारचे शोषण टाळण्यासाठी 'अंनिस' संघटनेची व 'जादूटोणा विरोधी कायद्या'च्या पोलिसांकरवी कठोरपणे अंमलबजावणीची,तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवादी विचार आणी वर्तनाची नितांत गरज संक्षेपात अधोरेखित केली.

शेटे मॅडम,शुभांगी यांनी 'अभिवादन करुन डॉ दाभोलकर,जोमाने पुढे नेवू चळवळ' ; 'बुद्ध,कबीर,भिमराव,फुले,या भुमीवर जन्मले';

'चला गड्यांनो पाऊल टाकू पुढ र, उखडून टाकू अंधश्रद्धेची मुळ र'; 'बोला आज मिळुनी सारे,ज्या ज्या घातक रुढी,दुष्ट प्रथा अन चाली, नष्ट करु या रे'; 'आम्ही प्रकाशबीजे रुजवित चाललो, वाटा नव्या युगाच्या रुळवीत चाललो'; ही व अशी गिते गायली.सर्व सहभागी कार्यकर्त्यांनी त्यांना उत्स्फूर्तपणे साथ दिली. विधिज्ञ कॉ भीमराव चव्हाण यांनी साने गुरुजींचे 'आता उठवू सारे रान,आता पेटवू सारे रान ' गावून वाटसरुंना देखील सहभागी होण्यास स्फूर्ती दिली. अखेरीस,प्रातिनिधिक स्वरूपात प्रेक्षक विद्यार्थी,शिक्षक,जेष्ठ नागरिकांना डॉ दाभोलकर,अंनिस, संविधान,''महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष ,अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अधिनियम-२०१३'' अनुषंगाने प्रश्न विचारले.तीन प्रश्नांची बरोबर उत्तरे देणा-यांना उपयुक्त पुस्तके भेट दिली.

'हम होंगे कामयाब एक दिन. चे सामुहिक गायनाने कार्यक्रमाचा समारोप झाला. नितीन जायभाये,पाशा भाई पटेल,डॉ संजय तांदळे,बाजीराव ढाकणे यांनी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. संघटनेचे किरण घाटगे, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ नाईकवाडे,रविंद्र मुंडे,शहादेव मिसाळ व महिलांची देखिल लक्षनिय उपस्थिती होती.

अभियानाची गरज,प्रास्ताविक व संचलन डी जी तांदळे यांनी केले. भीमराव चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.

**जाहिर प्रगटन**

मा. के. सी. माने ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड

किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १२१७/२०२६

CNR No. MHB02000021852026

गऊबाई बाबासाहेब धांडे व ईतर वि. निरंक

(मार्फत ॲड. बी. एन. तावरे)

अर्जदार :- १. गऊबाई भ्र. बाबासाहेब धांडे, वय-८५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. धांडे गल्ली ता. जि. बीड २. हरिश्चंद्र पि. बाबासाहेब धांडे, वय ५८ वर्षे, धंदा-शेती व व्यापार, रा. तेरवी लाईन, धांडे गल्ली, बीड ता. जि. बीड ३. रविंद्र पि. बाबासाहेब धांडे, वय ५६ वर्षे, धंदा-शेती व व्यापार, रा. बार्शी रोड, रेणू हॉस्पीटल जवळ, शिवाजी धांडे नगर, बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत बाबासाहेब पि. भिमाजी धांडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत बाबासाहेब पि. भिमाजी धांडे यांचा मृत्यु दिनांक १०/०४/२०२६ रोजी झालेला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत बाबासाहेब पि. भिमाजी धांडे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०८/०९/२०२६

आज दिनांक ३० माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
क.लिपीक
सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

स्वाक्षरित
आदेशावरुन,अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

**जाहिर प्रगटन**

मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज २५०/२०२६

कौशल्याबाई व इतर विरुध्द निरंक मार्फत ॲड. व्हि. एन. मस्के

अर्जदार :-१. कौशल्याबाई भ्र. त्रिंबक मिसाळ, रा. डागाचीवाडी, ता. पाटोदा, जि. बीड २. मनिषा भ्र. नवनाथ मिसाळ, रा. डागाचीवाडी, ता. पाटोदा, जि. बीड २अ. चैत्राली नवनाथ मिसाळ, रा. ३१अ/०७ एस. आर.पी. एफ ग्रुप बी गोरेगाव इस्ट मुंबई, आरेमिल्क कॉलनी, मुंबई, महाराष्ट्र ४०००६५ ह. मु. डागाचीवाडी, ता. पाटोदा, जि. बीड २ब. चैतन्य नवनाथ मिसाळ, रा. डागाचीवाडी, ता. पाटोदा, जि. बीड

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नवनाथ त्रिंबक मिसाळ, हे रा. डागाचीवाडी, ता. पाटोदा, जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी नवनाथ त्रिंबक मिसाळ, यांचा मृत्यु दिनांक ०६/०७/२०२३ रोजी तुंगार्ली, लोणावळा, मावळ, पुणे महाराष्ट्र येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार कं. १ ही मयताची आई असुन अर्जदार कं. २ मयताची पत्नी आहे, अर्जदार २ अ व २ब हे मयताचे अज्ञान मुलगी व मुलगा आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत

नवनाथ त्रिंबक मिसाळ, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१ सप्टेंबर २०२६.


स्वाक्षरित
क.लिपीक

स्वाक्षरित
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

### आडसकर यांच्या पुण्यस्मरणानिमीत बुधवारी साखरे महाराजांचे कीर्तन

केज । प्रतिनिधी

लोकनेते कै. बाबुरावजी आडसकर (तात्या) यांच्या १० व्या पुण्यस्मरणानिमित्त बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



यानिमित्त सकाळी १० वाजता ह.भ.प. कीर्तनकेसरी अक्रुर महाराज साखरे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. कीर्तनानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या पुण्यस्मरण कार्यक्रमास सर्व नेते, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींचे आजी-माजी सदस्य, कार्यकर्ते, व्यापारी, पत्रकार तसेच स्नेही मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केले आहे.

# चुका दुरुस्त केल्या तरच पीएम किसानचा हप्ता

पुणे : प्रधानमंत्री किसान पात्र सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेंतर्गत शेतकऱ्यांचे वार्षिक सहा हजार रुपयांचे हप्ते थांबल्याच्या तक्रारी वाढत आहेत. जमिनीचे प्रमाणीकरण, ई-केवायसी, आधारशी बँक खाते लिंक नसणे, डीबीटी व्यवहारातील त्रुटी किंवा महसूल विभागाच्या नोंदींमधील विसंगती यांसारख्या कारणांमुळे हप्ता अडकत असल्याचे समोर आले आहे. मात्र, संबंधित त्रुटी वेळेत दूर केल्यास लाभ पुन्हा सुरू होऊ शकतो. पीएम-किसान योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी जमिनीचे प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. महसूल विभागाच्या नोंदी आणि पीएम-किसान पोर्टलवरील माहितीमध्ये तफावत असल्यास लाभार्थ्यांचा हप्ता थांबू शकतो. अनेक शेतकऱ्यांचे अर्ज याच कारणामुळे प्रलंबित राहतात. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी महसूल विभागाशी संपर्क साधून जमिनीच्या नोंदींची पडताळणी करून आवश्यक दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



दुरुस्तीची संधी उपलब्ध : पात्र असूनही काही शेतकऱ्यांचे अर्ज विविध कारणांमुळे इनॲक्टिव्ह किंवा अपात्र ठरतात. अशा लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज करावा. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर अपात्रता दूर करून लाभ पुन्हा सुरू करण्याची प्रक्रिया केली जाते. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी वेळेत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

ई-केवायसीशिवाय हप्ता मिळणार नाही : पीएम-किसान योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी पूर्ण करणे बंधनकारक आहे. ई-केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांचे हप्ते थांबवले जातात. शेतकरी स्वतः पीएम-किसान पोर्टलवर, सीएससी केंद्रावर किंवा कृषी सहायकांच्या मदतीने ही प्रक्रिया पूर्ण करू शकतात. ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतर लाभ पुन्हा सुरू होण्यास मदत होते.

डीबीटी खाते आवश्यक : आधारशी बँक खाते लिंक नसल्यास पीएम-किसानचे अनुदान मिळत नाही. या योजनेचे अनुदान थेट आधार संलग्न डीबीटी सक्षम बँक खात्यात जमा केले जाते. खाते आधारशी लिंक नसल्यास किंवा डीबीटीसाठी सक्षम नसल्यास व्यवहार पूर्ण होत नाही आणि हप्ता अडकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या बँकेत जाऊन खाते आधारशी लिंक असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच आवश्यक असल्यास संबंधित बँकेत किंवा जवळच्या पोस्ट कार्यालयात डीबीटी सक्षम खाते उघडावे. खाते डीबीटीसाठी सक्षम झाल्यानंतर अनुदान जमा होण्यास कोणतीही अडचण राहत नाही.

# या जातीच्या मेंढ्या वर्षातून ६ ते ८ कोकरांना देतात जन्म



मांस तसेच लोकर व्यवसाय करण्यासाठी देशात बहुतेकजण आता मेंढ्यापालन व्यवसायाकडे वळलेले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय लोकप्रिय होत आहे, कारण त्यात कमी खर्चात जास्त नफा मिळतो. तसेच मांसाबरोबरच लोकरीलाही बाजारात मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध राज्यांतील सरकारे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. मात्र असे असतानाही केवळ सुधारित जातींची माहिती नसल्यामुळे बहुतेक मेंढीपालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. आज आपण मेंढ्यांच्या अशा जातीबद्दल माहिती घेणार आहोत ज्यांच्या व्यवसायातून शेतकरी मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवू शकतात. या मेंढीच्या जातीचे नाव आहे 'अविशान' .

'अविशान' ही मेंढ्यांची प्रगत जात असून त्याचे वजन खूप वेगाने वाढते. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी ३ ते ४ कोकरांना जन्म देते. त्याचबरोबर 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून दोनदा गर्भधारणा करतात. म्हणजेच ती एका वर्षात ६ ते ८ मुलांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी 'अविशान' जातीच्या मेंढ्या पाळल्यास त्यांना मोठा नफा मिळेल. ते मांस तसेच लोकर मोठ्या प्रमाणावर विकू शकतात.

अविशान मेंढ्यांचा इतिहास : अविशान मेंढ्यांचा क्लोन तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना खूप मेहनत घ्यावी लागली. १९९७ मध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबन येथून गारोल जातीच्या मेंढ्या आणण्यात आल्या. यानंतर मालपुरा येथील मेंढ्यांसह या जातीचा क्रॉसिंग करून क्लोन तयार करण्यात आला. परंतु शास्त्रज्ञांना पूर्ण यश मिळाले नाही. कारण या मेंढ्यांच्या जातीचा मृत्यूदर जास्त होता. शिवाय दूध देण्याची क्षमताही कमी होती. यानंतर गुजरातच्या पाटणवाडी जातीच्या मेंढ्या मालपुरा येथील मेंढ्यांसह क्रॉस करण्यात आल्या. मग मेंढीची प्रगत जात ''अविशान'' जन्माला आली. हे सामान्य जातीच्या मेंढ्यांपेक्षा जास्त दूध देते. शिवाय, त्याची प्रजनन क्षमता देखील जास्त आहे. वर्षातून दोनदा गर्भधारणा होते.

केवळ ५ टक्के मृत्युदर : अविशान कोकरू इतर जातीच्या मेंढ्यांपेक्षा ३० टक्के वेगाने वाढतात. कोकरे जन्मानंतर लगेचच विक्रीसाठी तयार होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्च येतो. सध्या उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थानसह अनेक राज्यांतील शेतकरी अविशान मेंढ्या मोठ्या प्रमाणावर पाळत आहेत. या मेंढ्यांच्या मृत्यूचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. मांसासाठी ३ महिन्यांचे कोकरू विकता शकता. एक कोकरू साधारणपणे २५०० रुपयांना विकले जाते. जर तुम्ही ५० मेंढ्यांसह अविशान शेती सुरू केली असेल तर तुम्ही एका वर्षात किमान २०० कोकरू विकू शकता.

# जनावरांच्या आरोग्यासाठी खरारा आवश्यक

पशू व्यवस्थापनामध्ये खरारा (ग्रूमिंग) हा एक महत्त्वाचा भाग आहे. खरारा केल्याने जनावरांचे आरोग्य चांगले राहाते. त्यांच्या मानसिकतेवर चांगला परिणाम होतो. नियमित खरारा, कातडीची देखभाल, खुरांची काळजी आणि बाह्य परजीवींचे व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. यातील प्रत्येक पद्धती ही आजाराचा प्रसार रोखण्यासाठी महत्त्वाची आहे. यामुळे जनावरे शारीरिकदृष्ट्या मजबूत आणि उत्पादन सक्षम राखण्यास मदत होते. बंदिस्त गोठे हे रोगप्रसारक आणि परजीवींच्या उत्पतीचे कारण आहे. त्यामुळे नियमित आणि वारंवार खरारा आवश्यक ठरतो.

खरारा केल्याने नियमित त्वचेची स्थिती, जखमा किंवा आजाराची चिन्हे लवकर शोधण्यात मदत होते. त्वरित उपचार करता येतात. संसर्गाचा धोका कमी करते. रक्ताभिसरण आणि त्वचेच्या आरोग्याला चालना मिळते, खरारा करताना पशू आणि मालकामध्ये परस्परसंवाद होतो. यामुळे तणावाची पातळी कमी होऊन जनावरे शांत आणि निश्चल होतात. सातत्यपूर्ण संवादांद्वारे पालकांचे पशूंसोबतचे नाते अधिक दृढ होते. त्यामुळे जनावरांची हाताळणी आणि तपासणी प्रक्रिया सुलभ घडते. आरोग्य सेवा, आजार नियंत्रण आणि पशूंच्या वर्तणुकीशी संवर्धन यांचे एकत्रीकरण म्हणून खरारा महत्त्वाचा आहे.

जनावरांमध्ये परजीवींचा प्रादुर्भाव रोखणे हे जनावराचे आरोग्य योग्य राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. परजीवी म्हणजे जंत आणि बाह्य कीटक जसे की गोचीड, गोमाशी, पिसवा आणि उवा यांचा समावेश होतो. परजीवींच्या प्रादुर्भावामुळे जनावर अस्वस्थ राहते. कुपोषण, अशक्तपणा आणि आजाराच्या समस्या दिसतात. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. हे लक्षात घेऊन परजीवी निर्मूलन, जंतनाशकांचा वापर आवश्यक आहे. याचबरोबरीने खरारा करणे हा प्रतिबंधात्मक उपाय महत्त्वाचा आहे. बाह्य परजीवींचा त्रास कमी होतो. याचबरोबरीने गोठ्यांची स्वच्छता करणे महत्त्वाचे ठरते. दाट केस किंवा लोकरीमध्ये वाढणारे जीव तयार होण्यापासून रोखण्यासाठी लोकर कातरणे आवश्यक ठरते. परजीवी प्रादुर्भाव रोखण्यासाठी चराई क्षेत्र व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. चराईच्या क्षेत्र बदलामुळे मातीत जन्मलेल्या परजीवींचा भार कमी होतो, ज्यामुळे जनावरे चरताना प्रादुर्भावाचा धोका कमी होतो.

स्वच्छ पाणी आणि योग्य स्वच्छता सुनिश्चित केल्याने परजीवींचा प्रसार रोखता येतो. परजीवी समस्या लवकर शोधण्यासाठी आणि उपचारांसाठी निरीक्षण आवश्यक आहे. नियमित विष्ठा तपासणीअंतर्गत परजीवी ओळखण्यात मदत होते. शारीरिक तपासणीमुळे बाह्य कीटकांचा प्रादुर्भाव लक्षात येतो. त्यांचा प्रसार होण्यापासून आणि कळपाच्या किंवा कळपाच्या एकूण आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणाम रोखण्यात मदत होते.

खरारा करण्याचे फायदे : खरारा केल्यामुळे जनावरांच्या शरीरावरील परजीवी, घाण निघून जाते. संक्रमण नियंत्रणात येते. रक्ताभिसरण आणि त्वचेचे आरोग्य सुधारते, कातडी चमकदार होते. त्वचा आजारांचे नियंत्रण होते. रोगजनकांचा मानव आणि इतर प्रजातींमध्ये प्रसार रोखता येतो. खरारा केल्याने संपूर्ण त्वचेमध्ये नैसर्गिक तेल प्रसारित होण्यास मदत होते, ज्यामुळे चमक आणि गुणवत्ता सुधारते. विशेषतः लांब केस असलेल्या प्राण्यांमध्ये केसांचा गुंता टाळता येतो. मेंढ्या आणि ससा यांच्या विशिष्ट जाती लोकर किंवा फरसाठी वाढविल्या जातात. त्यांच्यामध्ये खरारा केल्यामुळे गुणवत्ता चांगली राहते. जाड कातडी असलेल्या जनावरांमध्ये उष्णतेच्या ताणापासून बचाव करण्यासाठी खरारा महत्त्वाचा आहे. जास्तीचे केस काढून टाकून किंवा मेंढ्यांमध्ये जाड लोकरीची कापणी महत्त्वाची ठरते. शरीराचे तापमान अधिक प्रभावीपणे नियंत्रित करण्यात मदत होते, त्यामुळे उष्ण हवामानात उष्णतेशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.



# हुरड्यासाठी ज्वारीच्या या वाणांची करा लागवड

हिरव्या दाण्याचा हुरडा अतिशय स्वादिष्ट लागतो, कारण त्यावेळेस या दाण्यामध्ये मुक्त अमिनो आम्ल, साखर, विद्राव्य प्रथिने, जीवनसत्वे यांचे प्रमाण अधिक असून पिष्टमय पदार्थांचे प्रमाण कमी असते. खास हुरडा पार्टी साठी गोडसर रसाळ आणि भरपूर दाणे असणाऱ्या जाती राज्यातील कृषि विद्यापीठांनी विकसित केल्या आहेत.

हुरड्यासाठी ज्वारीच्या वाणांची नावे : खरीप लागवडीसाठी वाण - पीडीकेव्ही कार्तिकी (वाणी १०३), पीकेव्ही अश्विनी (वाणी ११/६).

रब्बी लागवडीसाठी वाण - फुले मधुर, एसजीएस ८-४, परभणी वसंत, ट्रॉम्बे अकोला सुरुची.

स्थानिक वाण : सुरती, गूळभेंडी, कुची कुची, काळी दगडी, वाणी, मालदांडी.

हुरड्याच्या वाणांची सविस्तर माहिती : १) एसजीएस-८-४ : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेला वाण. हुरडा रुचकर आणि गोड. हुरड्याची प्रत उत्तम, कणसातील दाणे सहजरीत्या वेगळे होतात. इतर हुरड्याच्या जातीपेक्षा याचा दाणा टपोरा. हुरडा उत्पादन १५-१६ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन ७०-७५ क्विंटल प्रति हेक्टरी. २) फुले उत्तरा : स्थानिक जातीतून निवड पद्धतीने विकसित. हुरड्याची अवस्था येण्यास ९०-१०० दिवस. भोंडातून दाणे सहज बाहेर पडतात. सरासरी ७०-९० ग्रॅम इतका हुरडा मिळतो. हुरडा चवीस सरस अत्यंत गोड.



ताटे गोड असल्याने जनावरे कडबा चवीने खातात. कणीस गोलाकार, मध्यम घट्ट मध्यम उंचीचा, पाने पालेदार, खोड मध्यम, गोड रसरशीत. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. हुरडा उत्पादन २०-२५ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन ५५-६० क्विंटल प्रति हेक्टरी. ३) फुले मधुर (आर एस एस जी व्ही -४६) : उत्कृष्ट प्रतीचा व चवदार हुरडा. खोड मध्यम, गोड, रसरशीत. वाण उंच व पालेदार जात. हुरडा अवस्था येण्यास ९३ ते ९८ दिवस लागतात. हुरडा अवस्थेत दाणे सहज सुटण्याचे प्रमाण हे ९५ टक्के पेक्षा जास्त. खोडमाशी किडीस, खडखड्या रोगास प्रतिकारक.

अवर्षणास प्रतिकारक. हुरड्याचे उत्पादन ३०-३५ क्विं./हे. कडब्याचे उत्पादन ६५-७० क्विं./हेक्टर. ४) सुरती : चवीला अत्यंत गोड, त्यामुळे मागणी चांगली. दाण्याचा आकार गोल. कणसांचा आकार थोडा वाकडा. या ज्वारीचे एकरी ५-७ क्विंटल उत्पादन निघते. शिवाय ६० क्विंटल पर्यंत हिरवा कडबा सुद्धा होतो. हा हुरडा ९० ते १०० दिवसांनी काढणीस येतो. ५) परभणी वसंत (पीव्हीआरएसजी १०१) : खाण्यास चवदार, गोड, मऊ. कणसातून दाणे सहजरीत्या वेगळे होतात. हुरड्याची अवस्था येण्यास ९५ दिवस. खोडमाशी, खोड कीड व खडखड्या रोगास सहनशील. दाण्याची आणि कडब्याची प्रत उत्तम. हुरडा उत्पादन ३४ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन १३३-१३५ क्विंटल प्रति हेक्टरी. मराठवाडा विभागासाठी शिफारस. ६) ट्रॉम्बे अकोला सुरुची (टी ए के पी एस -५) : मळणीस अतिशय सुलभ. हुरड्याची प्रत उत्तम, चवदार. हुरडा तयार होण्याचा कालावधी ९१ दिवस. हुरड्याचे उत्पादन ४३ क्विंटल. हिरवा चारा उत्पादन ११० क्विंटल. महाराष्ट्रासाठी प्रसारित. ७) पी डी के व्ही कार्तिकी (वाणी १०३) : हुरडा चवदार आणि गोड हुरडा ८२ ते ८४ दिवसात तयार होतो. मीज माशीच्या प्रादुर्भावाला बळी पडत नाही. हुरडा उत्पादन ४२ ते ४३ क्विंटल प्रति हेक्टर. विदर्भासाठी प्रसारित. ८) के व्ही अश्विनी ( वाणी ११/६) : ८२ ते ८४ दिवसात हुरडा तयार : हुरडा मळणीस सुलभ. हुरडा अधिक गोड व चवदार. दाण्यात साखरेचे प्रमाण अधिक. मीज माशी प्रतिकारक. हुरडा उत्पादन ४२-४३ क्विंटल प्रति हेक्टरी.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

इ.स.पू. ३११४ : मेसोअमेरिकन लॉन्ग कॅलेंडर सुरु झाले.
१८७७ : अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ हॉल यांनी मंगळाच्या फोबॉस व डिमॉस या चंद्रांचा शोध लावला.
१९४३ : सी. डी. देशमुख हे 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया'चे पहिले भारतीय गव्हर्नर झाले.
१९५२ : हुसेन बिन तलाल जॉर्डनचे राजे बनले.
१९६० : चाडला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६१ : दादरा व नगर हवेली हा भाग भारताचा केन्द्रशासित प्रदेश बनला.
१९७९ : गुजरातेतील मोर्वी येथे धरण फुटून हजारो लोक मृत्यूमुखी पडले.
१९८७ : 'युनायटेड स्टेट्स फेडरल रिझर्व्ह'च्या अध्यक्षपदी ॲलन ग्रीनस्पॅन यांची निवड झाली.
१९९४ : अफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या व डॉ. नेल्सन मंडेला यांच्या निकटवर्ती सहकारी डॉ. फातिमा मीर यांना 'विश्वगुर्जरी पुरस्कार' जाहीर
१९९९ : शतकातील शेवटचे खग्रास सूर्यग्रहण झाले.
१९९९ : बारा वर्षाखालील मुलांच्या राज्यस्तरीय जलद बुद्धीबळ स्पर्धेत नवी दिल्ली येथील सहा वर्षे वयाच्या परिमार्जन नेगी याने विजेतेपद पटकावले. ही स्पर्धा जिंकणारा आजवरचा तो सर्वात छोटा खेळाडू आहे.
२००३ : नाटो अफगाणिस्तानमधील शांती सैन्याची कमान हाती घेतली, ते नाटोचे ५४ वर्षांच्या इतिहासात युरोपबाहेरील पहिले मोठे ऑपरेशन आहे.
२०१३ : डॉ. सुब्रम्हण्यम स्वामी यांच्या जनता पक्षाचे भारतीय जनता पक्षात विलीनीकरण झाले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७८ : जर्मन व्यायामशाळेचे शिक्षक आणि राष्ट्रवादी फ्रेडरिक लुडविग जॉन यांचा जन्मदिन.
१८९७ : एनिड ब्लायटन बालसाहित्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इंग्लिश लेखिका (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९६८)
१९११ : प्रेम भाटिया पत्रकार, संपादक, राजकीय विश्लेषक आणि मुत्सद्दी (मृत्यू: ८ मे १९९५)
१९२८ : रामाश्रेय झा संगीतकार, वादक व शास्त्रीय संगीतातील विद्वान (मृत्यू: १ जानेवारी २००९)
१९२८ : विनायक सदाशिव तथा वि. स. वाळिंबे लेखक व पत्रकार (मृत्यू: २२ फेब्रुवारी २०००)
१९४३ : जनरल परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे १० वे राष्ट्राध्यक्ष
१९४४ : फेडएक्स कंपनीचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी फ्रेडरिक स्मिथ यांचा जन्मदिन.
१९४९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ, सेंट्रल बँकर आणि निवृत्त आयएएस अधिकारी तसचं, भारतीय रिझर्व्ह बँकचे माजी २२ वे गव्हर्नर दुव्वरी सुब्बाराव यांचा जन्मदिन.
१९५४ : यशपाल शर्मा क्रिकेटपटू
१९५४ : क्रिकेटपटू यशपाल शर्मा यांचा जन्म.
१९५० : ॲपल इन्क कंपनीचे सहसंस्थापक स्टीव्ह वोजनियाक यांचा जन्म.
१९७४ : अर्जुन पुरस्कार सन्मानित माजी भारतीय क्रिकेटपटू व कर्णधार अंजू जैन यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०८ : खुदिराम बोस क्रांतिकारक (जन्म: ३ डिसेंबर १८८९)
१९७० : इरावती कर्वे साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेत्या मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व शिक्षणतज्ञ (जन्म: १५ डिसेंबर १९०५)
१९९९ : रामनाथ पारकर क्रिकेटपटू (जन्म: ३१ आक्टोबर १९४६)
२००० : पी. जयराज मूकपटांच्या जमान्यापासून हिन्दी चित्रपटसृष्टीचे साक्षीदार असलेले दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९८०) अभिनेते (जन्म: २८ सप्टेंबर १९०९)
२००३ : अर्मांड बोरेल स्विस गणितज्ञ (जन्म: २१ मे १९२३)
२०१३ : भारतीय पक्षीशास्त्रज्ञ आणि लेखक जफर फटहॅली यांचे निधन. (जन्म: १९ मार्च १९२०)

# घरच्या घरी तयार करा निंबोळी अर्क; प्रभावी व पर्यावरणपूरक किटकनाशक

रासायनिक कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे पिकांचे नुकसान, मातीच्या गुणवत्तेचा ऱ्हास, मानवी आरोग्यावर दुष्परिणाम आणि पर्यावरणीय संकटे या समस्या गंभीर बनल्या आहेत. यावर एक नैसर्गिक, प्रभावी व किफायतशीर उपाय म्हणजे निंबोळी अर्क. हे किटकनाशक घरच्या घरी तयार करता येते, तेही कोणताही अतिरिक्त खर्च न करता.

निंबोळी अर्क म्हणजे काय? : कडूनिंबाच्या पिकलेल्या फळांपासून तयार होणारा हा अर्क मावा, तुडतुडे, अमेरिकन बोंडअळी, पाने पोखरणारी व देठ कुरतडणारी अळी, फळमाशी, खोडकीडा इत्यादी किडींवर अत्यंत प्रभावी आहे. ५% प्रमाणात फवारणी केल्यास हे किड नियंत्रण सुनिश्चित करता येते.

घरच्या घरी निंबोळी अर्क तयार करण्याची सोपी पद्धत : निंबोळ्यांची तयारी : बांधावर किंवा रस्त्याच्या कडेला पडलेल्या पिकलेल्या निंबोळ्या गोळा करा. त्यातील साल व गर काढून फक्त बिया स्वच्छ धुवून सावलीत वाळवा. कोरड्या ठिकाणी साठवून



ठेवा.निंबोळी पावडर तयार करणे : या बिया खलबत्यात किंवा पल्वरायझरमध्ये बारीक करून ५ किलो पावडर तयार करा. ती ९ लिटर पाण्यात भिजवा. दुसऱ्या भांड्यात १ लिटर पाण्यात २०० ग्रॅम साबणाचा चुरा भिजत ठेवा. अर्क तयार करणे : दुसऱ्या दिवशी निंबोळी अर्क कपड्यातून गाळा. त्यात साबणाचे द्रावण मिसळा. हे मिश्रण ९० लिटर पाण्यात मिसळून १०० लिटर फवारणीयोग्य द्रावण तयार करा.

फायदे : प्रभावी कीड नियंत्रण. अत्यल्प खर्च. सहज उपलब्ध व घरच्या घरी तयार करता येणारा उपाय. पर्यावरणपूरक आणि निसर्गाशी सुसंगत. उत्पादन खर्चात बचत, नफ्यात वाढ. निंबोळी अर्क फवारणीच्या दिवशीच तयार करावा. बाजारातील दर्जाहीन सेंद्रिय किटकनाशकांपेक्षा घरचा अर्क अधिक प्रभावी व सुरक्षित ठरतो.

# ओबीसीची जात निहाय जनगणना झालीच पाहिजे-प्रा. सुशीला मोराळे

बीड। प्रतिनिधी

३६ वर्षांपूर्वी देशात १९८९ ला सत्ता परिवर्तन घडून आले देशातील काँग्रेस पक्षाची एक हाती सत्ता जाऊन जनता दलाच्या नेतृत्वात भाजपा, डी एम के, झामुजोसह मुफ्ती मोहम्मदच्या पक्षासह व्ही. पी. सिंगाच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाले ११ महिने अत्यंत लोकप्रिय निर्णय या सरकारने घेतले, डॉक्टर आंबेडकरांना भारतरत्न दिला, मंडल आयोगाची अंमलबजावणी केली, शेतकऱ्यांना सरसकट दहा हजाराची कर्जमाफी कोणतीही अट शर्त न घालता दिली. खताच्या किमती कमी केल्या अनेक प्रश्न सोडवले. परंतु जनता दल हा पक्ष अनेक विचारांच्या लोकांनी काँग्रेसला पर्याय म्हणून उभा केला होता. त्यामुळे हे सगळे रथी, महारथी फारकाळ एकत्र टिकू शकले नाहीत. देवीलाल यांनी बंड पुकारले आणि व्हि.पी. सिंगाचे सरकार पाडण्याचे आव्हान दिले सरकार पडणारच आहे तर जाता जाता व्हि.पी. सिंगांनी ऐतिहासिक काम केले आणि मंडल आयोगाची अंमलबजावणी केली. ओबीसींना शिक्षण व नौकऱ्यात २७% आरक्षण लागू केले भाजपाने जनता दलाचा पाठिंबा काढून घेतला सरकार पाडले. जे आरक्षण दिले म्हणून जनता दलाचे सरकार गेले ते आरक्षण भाजपाचे सरकारने जवळपास संपवले आहे. ओबीसी ची जात निहाय जनगणना करून देशासमोर आता किती ओबीसी आहेत हे एकदा सरकारने जाहीर करावे असे अवाहन ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील सभेत केले आहे.







खरं म्हणजे आरक्षणाच्या बुडाशी भारताचे संविधान आहे, घटनेच्या ३४० कलमान्वये हे आरक्षण दिले आहे. दरडोई फक्त १५ रुपये ओबीसीच्या वाट्याला येतात ज्या संस्था नौकऱ्या मिळत होत्या त्या सर्व सरकारने भांडवलदारांना विकल्या आहेत. आमच्या आरक्षणाचे सरकारने तीन तेरा वाजवले आहेत *स्वतः संघप्रमुख म्हणतात "हम आरक्षण मुक्त भारत चाहते है.मनातच खोट आहे फक्त प्रधानमंत्री ओबीसी आहेत म्हणून ओबीसी चे प्रश्न सुटत नसतात. ओबीसींना आरक्षण देणारे व्हि.पी. ठाकूर होते ते ओबीसी नव्हते तरी ही समान संधीसाठी विशेष संधी हे सूत्र ठरवून त्यांनी ओबीसींना सामाजिक न्याय दिला आरक्षण ही रोजगार हमी नाही, गरिबी हटाव कार्यक्रमही नाही हे प्रतिनिधित्व आहे हजारो वर्ष वंचित उपेक्षित भटक्या विमुक्तांना देशाच्या अजेंड्यावर आणण्यासाठी डॉक्टर आंबेडकरांनी ३४० कलम ओबीसीसाठी संविधानात घातले म्हणून स्वातंत्र्यानंतर ४२ वर्षांनी ओबीसींना न्याय मिळाला होता. महाराष्ट्र सरकारला आमची एकच विनंती आहे ओबीसींना खरा न्याय द्या मतपेटीवर डोळा ठेवून काम करू नका तमिळनाडूत स्टॅलिनने खूप चांगले काम केले होते देशाच्या जीडीपी पेक्षा तामिळनाडूचा जीडीपी जास्त आहे. तरीही सिनेमातल्या नटाला तिथल्या जनतेने निवडून दिले. खूप काम करत असल्याचा आव आणू नका सत्ता ही दुपारची सावली आहे असे समजून वागा ओबीसीच्या अन्नात विष घालू नका हजारो वर्षानंतर त्यांना ही संधी मिळाली आहे हे विसरू नका पण ज्या भाजपा सरकारला संविधानच मान्य नाही हे अलीकडील पक्ष फुटीच्या राजकारणामुळे लक्षात येईल हम करे सो कायदा या उक्तीप्रमाणे सरकार वागत आहे. आरक्षणाची प्रचंड मोडतोड सरकारने केली आहे २७२ जाती १९९० च्या मंडल आयोगाप्रमाणे महाराष्ट्रात होत्या आता जवळपास १०० जाती नव्याने समाविष्ट झाल्या आहेत देशात ३७४३ इतक्या जाती होत्या आता ही संख्या ५ हजार पर्यंत पोहचली आहे. फक्त संख्या वाढवून आपली मतपेटी भक्कम करणे हाच अजेंडा राज्य व केंद्र सरकारचा आहे. देवेंद्रजी तर म्हणतात माझा आणि ओबीसीचा डीएनए एकच आहे जर हे सत्य असेल तर देवेंद्रजी तुम्ही आमचे पूर्ण आरक्षण संपवले आहे कोर्टात अडकवले आहे. सध्या सुरू असलेल्या जनगणनेत जातनिहाय ओबीसीचा कॉलम प्रधानमंत्री यांना समाविष्ट करायला लावा असे आव्हान मी करत आहे जिल्हा परिषदेच्या रखडलेल्या निवडणुका तात्काळ घ्या. मंडळ आयोगाची १००% अंमलबजावणी करा या मागण्या तात्काळ मंजूर करा. याप्रसंगी प्रा. सुशीलाताई मोराळे, राजेंद्र सानप, पांचाळ गुरुजी,जिल्हाध्यक्ष देविदास चव्हाण, बबनराव आंधळे,गणेश राऊत, प्रा. जावेद पाशा, उत्तमराव पवार,अंकुश सोनवणे. अमोल राठोड, वैजीनाथ शिंदे, किशोर राऊत, संतोष काळे,अमर विद्यागर . जगन्नाथ आंधळे,सुनील फुलारी, संजय गुरव इत्यादी उपस्थित होते.

# 'राजमाता जिजाऊ' बसमुळे ग्रामीणच्या प्रवाशांना दिलासा

## कुंभार पिंपळगावात नव्या एसटी बसचे उत्साहात स्वागत

अंबड। प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाने अंबड, घनसावंगी, परतूर तालुक्यातील ग्रामीण प्रवाशांसाठी सुरू केलेल्या 'राजमाता जिजाऊ' एसटी बससेवेचे कुंभार पिंपळगाव बसस्थानकावर ग्राम विकास युवा मंचतर्फे स्वागत करण्यात आले. बसचे विधिवत पूजन झाले. चालक, वाहक, वाहतूक कर्मचाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार झाला. ३२ आसनरचना, ४५ आसन क्षमतेची ही आधुनिक बस आहे.

महामंडळाने अंबड आगाराच्या गुंज-छत्रपती संभाजीनगर मार्गावर एमएच-१४-एनई-८६२७ क्रमांकाची बस सुरू केली. परतूर आगाराच्या परतूर-गेवराई मार्गावर एमएच-१४-एनई-८६१५ क्रमांकाची बस सुरू केली. ग्रामीण प्रवाशांना आधुनिक, दर्जेदार प्रवास मिळावा, हा उद्देश आहे. विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार, व्यापारी, महिला, ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळणार आहे. विभाग नियंत्रक मनीषा सपकाळ, विभागीय वाहतूक अधिकारी सुरेश टकले, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या प्रयत्नांचे उपस्थितांनी कौतुक केले. स्वागत कार्यक्रमात कुंभार पिंपळगावचे वाहतूक नियंत्रक बालासाहेब क्षीरसागर, अंबड आगाराचे चालक गोविंद बोराडे, वाहक मीरा इंझे-साबळे, परतूर आगाराचे चालक भारत गिरी, वाहक कल्याण सोळंके यांचा सत्कार झाला. कार्यक्रमास ग्राम विकास युवा मंचचे अल्केश व्यवहारे, वैभव कुलकर्णी, प्रकाश बिलोरे, अंकुश कंटुले, भागवत राऊत, शिवाजी सुरासे, गौतम शिंदे, ज्येष्ठ पत्रकार इब्राहिम पठाण, डॉ. शहाजी तौर, भरत कंटुले, गणेश कंटुले, अशोक सवणे, विनोद कंटुले, श्रीमंत आर्दड, महारुद्र टेकाळे, नागेश देशमुख, ज्ञानेश्वर भोसले आदी उपस्थि होते. बसचे स्वागत; जुन्या फेऱ्यांची प्रतीक्षा कायम अंबड-मेहकर, अंबड-सेलू, परतूर-कुंभार पिंपळगाव या मार्गावरील दिवसातून तीन फेऱ्या तसेच परतूर-गेवराई मार्गावरील दोन फेऱ्या बंद असल्याने विद्यार्थ्यांसह शेतकरी, नोकरदार, व्यापारी व ज्येष्ठ नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या बंद फेऱ्या तातडीने पूर्ववत सुरू कराव्यात, अशी जोरदार मागणी प्रवाशांनी केली आहे.

# काँग्रेसच्या वतीने राज्य सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन

## शेतकरी, विद्यार्थी, महिला, दिव्यांगांसह सर्व घटक त्रस्त

मंठा। प्रतिनिधी

राज्य शासनाच्या गलथान कारभाराच्या निषेधार्थ मंठा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवार ता. १० ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. यासंदर्भात काँग्रेसच्या वतीने तहसीलदार मंठा यांना निवेदन देण्यात आले असून राज्य सरकारने प्रत्येक वर्गाला भेटीस ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे, हुकूमशाही पद्धतीने नागरिकांना त्रास दिला जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

घरकुल लाभार्थ्यांना वेळेवर रेती आणि बांधकामाचे हप्ते देण्यात यावेत, नीट पेपर फुटी प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा करावी, कोणतेही कारण नसताना लाडकी बहीण योजनेतून अपात्र केलेल्यांना पुन्हा पात्र करून पूर्ववत मानधन द्यावे, ग्रामीण भागातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, सन २४-२५ मधील फसव्या पीक विमा योजनेमुळे बधित्त शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान द्यावे, संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे रखडलेले मानधन वितरत करावे, दिव्यांगांना थकीत मानधन त्वरित अदा करावे, शिक्षकांना केवळ अध्यापनाचे काम द्यावे, अतिरिक्त कामाचा ताण कमी करून जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढवावी आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, माजी जिल्हाध्यक्ष राजेभाऊ देशमुख, अॅड. अन्वर देशमुख, तालुकाध्यक्ष विवेक घारे, निळकंठ वायाळ, शरद बोराडे,डॉ. शरद शेळके, अविनाश चव्हाण, डॉ. शिवाजी गणगे, गौतम सदावर्ते, आसाराम चोरमारे, सुरेश वाव्हळ, राजेश खंदारे, सिराजखान पठाण, ह.भ.प. अन्सीराम महाराज, केंधळी भजनी मंडळ व ईतर भजनी मंडळ उपस्थित होते.




# कळमनुरीत क्रांतीकारी शेतकरी संघटनेचा तहसील कार्यालयावर मोर्चा

## खरडणी अनुदान गैरव्यवहार प्रकरणातील दोषींवर कारवाईची मागणी

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील पिंपरी व परिसरातील खरडणी अनुदानातील गैरव्यवहार प्रकरणात दोषींवर करावी या मागणीसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी ता. १० तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. कळमनुरी तालुक्यातील येगाव, पिंपरी बुद्रूक, कृष्णापूर या शिवारामध्ये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात या परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या परिसरात नुकसानीचे अनुदान देण्यासाठी शेतकऱ्यांच्या याद्या तयार करण्यात आल्या होत्या. सदर याद्या ग्राम महसूल अधिकारी व कृषी सहाय्यक यांनी प्रमाणित करून दिल्या होत्या. मात्र या याद्यांमध्ये ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांच्या नावे अनुदान देण्यात आले तर काही जणांना अत्यंत कमी अनुदान मिळाले.



या संदर्भातील तक्रारीनंतर तहसील कार्यालयाने चौकशी केली होती. या चौकशीमध्ये खरा प्रकार उघड झाला असून त्यानंतर कृषी सहाय्यक एस. एस. संगमवार यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. मात्र या प्रकरणातील अन्य दोषींवर अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपध्दतीवर संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून शेतकऱ्यांवर झालेला अन्या दूर करावा तसेच प्रकरणातील अन्य दोषींवर कारवाई करावी या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला. क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या मोर्चात संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, पदाधिकारी चैतन्य चव्हाण, ज्ञानेश्वर जाधव, दिलीप जाधव, बाळू पाटील, शुभम मुळे, विलास जाधव, किसन सावंत, उत्तम थोरात, विजय जाधव, बाबाराव जाधव, प्रविण मते यांच्यासह शेतकरी सहभागी झाले होते. सदर मोर्चा तहसील कार्यालयावर आल्यानंतर तहसील प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाकडे सादर केले जाणार असून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन तहसीलदार जीवककुमार कांबळे यांनी दिले आहे.

# अभिजित दिपकेंविरोधात उपोषण करणाऱ्यांची प्रकृती खालावली

## पोलिसांकडून रुग्णालयात दाखल; आंदोलकांचा उपोषण सुरूच ठेवण्याचा इशारा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांच्या विरोधात विभागीय आयुक्त कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषणाला आता नवे वळण लागले आहे. गेल्या चार दिवसांपासून अन्नत्याग करून उपोषणाला बसलेले मनीष ब्रह्माभट आणि राहुल पांड्या यांची प्रकृती खालावल्याने, पोलिसांनी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. मात्र,"पोलिसांनी आम्हाला बळजबरीने रुग्णालयात दाखल केले असून, आमचे हे उपोषण कोणत्याही परिस्थितीत सुरूच राहील," अशी भूमिका मनीष ब्रह्माभट यांनी रुग्णालयातून मांडली आहे.

दरम्यान, दीपके यांच्या विरोधात आंदोलन सुरू असतानाच, दुसरीकडे अभिजीत दीपके यांनी गुरुवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये एका मोठ्या देशव्यापी मोहिमेची घोषणा केली आहे. 'क्या बोलती पब्लिक' या नावाने सप्टेंबर महिन्यापासून हे अभियान संपूर्ण देशभरात राबवले जाणार आहे. या मोहिमेअंतर्गत सीजेपीचे कार्यकर्ते गाव-शहरांमध्ये जाऊन तरुणांशी थेट संवाद साधतील. देशातील वाढती बेरोजगारी आणि महागडे शिक्षण हे या मोहिमेचे प्रमुख मुद्दे असणार आहेत, असे दीपके यांनी स्पष्ट केले. याच पार्श्वभूमीवर, सीजेपीने गुरुवारी आपल्या राष्ट्रीय कार्यकारिणी समितीच्या सदस्यांच्या नावांचीही अधिकृत घोषणा केली. पक्षाची पाळेमुळे देशभरात रुजवण्यासाठी आगामी सहा महिन्यांत राज्य समन्वय समित्या, तसेच लोकसभा आणि शहर पातळीवरील समन्वय समित्या (युनिट्स) स्थापन केल्या जाणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

कॉकरोच जनता पार्टीने अलीकडेच 'नीट' पेपरफुटीच्या मुद्द्यावरून देशभरात मोठे रान उठवले होते. २० जून ते २५ जुलै असे सलग ३६ दिवस दिल्लीतील जंतर-मंतरवर सीजेपीने धरणे आंदोलन केले होते. अखेर २५ जुलै रोजी धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर, सीजेपीने हे आंदोलन यशस्वीपणे मागे घेतल्याची घोषणा केली होती. आता 'क्या बोलती पब्लिक' या नव्या मोहिमेतून सीजेपी पुन्हा एकदा तरुणांचे प्रश्न ऐरणीवर आणण्याच्या तयारीत आहे.

# अंधारात एनसीसी प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे हाल; बंद पथदिवे आणि मोकाट कुत्र्यांचा धोका

## जीएस महाविद्यालयातील प्रशिक्षणात ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग

जालना । प्रतिनिधी

जालना एज्युकेशन सोसायटीच्या आर. जी. बगडिया आर्ट्स, एस. बी. लखोटिया कॉमर्स आणि आर. बेझंजी सायन्स महाविद्यालयात (एनसीसी) चे उत्कृष्ट दर्जेदार प्रशिक्षण सुरू आहे. मोहिते सर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या प्रशिक्षणात जवळपास २०० विद्यार्थीनी आणि ३०० विद्यार्थी, असे सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होत आहेत. आगामी १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्य दिनाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दररोज पहाटे ४.३० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रशिक्षणाला सुरुवात होते आणि सकाळी ७ वाजेपर्यंत प्रशिक्षण सुरू असते. स्वातंत्र्य दिनाच्या संचलनासह विविध कार्यक्रमांची तयारी सुरू असल्याने या प्रशिक्षण शिबिराला सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे. जालना शहरासह ग्रामीण भागातूनही मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि विद्यार्थीनी या प्रशिक्षणात सहभागी होत आहेत. पहाटे ४.३० वाजता महाविद्यालयात पोहोचण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांना सकाळी ४ वाजताच घराबाहेर पडावे लागते. मात्र, याच वेळेत जालना शहरातील अनेक रस्त्यांवरील पथदिवे बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना अंधारातून प्रवास करावा लागत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्यांवर पुरेसा प्रकाश नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



पहाटेच्या वेळी शहरातील अनेक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा वावर असल्याचे दिसून येत आहे. ठिकठिकाणी कुत्र्यांचे मोठमोठ्याने भुंकणे, वाहनांच्या मागे धावणे तसेच अचानक रस्त्यावर येणे यामुळे प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पहाटेच्या अंधारात एकट्या किंवा छोट्या गटाने प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातून दुचाकी, सायकल किंवा इतर वाहनांनी येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या समस्येचा सामना करावा लागत आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महानगरपालिकेने तातडीने लक्ष द्यावे च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, देशभक्ती, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमासाठी पहाटेपासून कठोर प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळे जालना शहर महानगरपालिकेने तातडीने शहरातील बंद पथदिवे सुरू करावेत. खराब झालेले पथदिवे त्वरित दुरुस्त करावेत आणि प्रशिक्षणाच्या मार्गावरील प्रमुख रस्त्यांवर पहाटेच्या वेळी पुरेसा प्रकाश राहील याची विशेष व्यवस्था करावी. त्याचबरोबर शहरातील वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या समस्येवरही तातडीने प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण व नियमानुसार व्यवस्थापन करण्यासाठी महापालिकेने विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे होण्याची गरज : स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमासाठी देशभक्तीची भावना मनात ठेवून पहाटेपासून प्रशिक्षण घेणाऱ्या सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे जालना महानगरपालिका प्रशासनाने बंद पथदिवे सुरू करण्यासोबतच मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी विद्यार्थी, पालक आणि नागरिकांकडून होत आहे.

# जायकवाडीच्या पाण्याचा गोदावरीत विसर्ग; ढालेगाव बंधाऱ्याचे एक गेट उघडले

## तारुगव्हाण व मुळी बंधाऱ्यातही पाण्याची आवक वाढणार; नदीपात्रात न जाण्याचा प्रशासनाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

जायकवाडी धरणात ९० टक्क्यांपेक्षा अधिक पाणीसाठा झाल्याने तसेच धरणात पाण्याची आवक वाढत असल्याने गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू आहे.या विसर्गाचे - पाणी आता परभणी जिल्ह्यातील ढालेगाव उच्च पातळी बंधाऱ्यापर्यंत पोहोचले असून, ढालेगाव बंधाऱ्याचे एक गेट उघडून गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

लघु पाटबंधारे विभाग,परभणीचे कार्यकारी अभियंता यांनी दि. १० ऑगस्ट सोमवार रोजी पाथरी,गंगाखेड, परळी व माजलगावच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना याबाबत पत्राद्वारे सूचना दिल्या आहेत. जायकवाडी धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणानुसार गोदावरी नदीतील विसर्ग कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.ढालेगाव बंधाऱ्याच्या खालील बाजूस असलेल्या तारुगव्हाण उच्च पातळी बंधारा तसेच मुळी निम्न पातळी बंधारा येथेही पाण्याची आवक





निर्माण होणार असून,या दोन्ही बंधाऱ्यांतील पाणीसाठा अपेक्षित पातळीपर्यंत पोहोचल्यानंतर तेथूनही नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.दरम्यान, बंधाऱ्यांमधील पाणीसाठा, पाणीपातळी आणि विसर्गाची माहिती प्रशासनाला मोबाईल, व्हॉट्सप ग्रुप व ई-मेलद्वारे वेळोवेळी देण्यात येणार आहे. नदीपात्रात जाण्यास मनाई गोदावरी नदीपात्रातील तसेच नदीच्या दोन्ही तीरावरील शेतकरी व ग्रामस्थांनी सतर्क राहावे, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. नदीपात्रात जाणे, नदीकाठावर जाणे तसेच पशुधन नदीपात्रात नेणे टाळावे, अशा स्पष्ट सूचना महसूल यंत्रणेला देण्यात आल्या आहेत.पाण्याचा विसर्ग अचानक वाढण्याची शक्यता लक्षात घेता कोणत्याही प्रकारची जीवित अथवा आर्थिक हानी होऊ नये, यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माजलगाव, पालम,सोनपेठ, पाथरी,गंगाखेड व परळी तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याची गरज आहे.

# सी टू किसान सभा,शेतमजुर युनियनच्या वतीने माजलगावात रास्ता रोको

माजलगाव । प्रतिनिधी

सिटू ,शेतमजूर युनियन व किसान सभा या संघटनांच्या वतीने वेगवेगळ्या मागण्यासाठी दि १० ऑगस्ट सोमवार रोजी माजलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आक्रमक रस्ता रोको करण्यात आला.

संपूर्ण भारत देशात दि १० ऑगस्ट सोमवार रोजी या संघटनाच्या वतीने जेलभरो,रस्ता रोको व विविध आंदोलने करण्यात आले, त्याचाच एक भाग म्हणून माजलगावात रास्ता रोको करण्यात आला. या रास्ता रोको आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने कामगार शेतकरी व मजूर सहभागी होते.यावेळी आंदोलनकर्त्यांच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.





संघटनांच्या वतीने सरकारकडे विविध स्वरूपाच्या मागण्या करण्यात आल्या.यामध्ये केंद्र सरकारने एन एच एम या योजनेचे खाजगीकरण करण्यात येऊ नये,आशांचा एक वर्षापासून थकलेला १५००/ चा मोबदला त्वरित देण्यात यावा,शालेय पोषण कामगारांचे महाराष्ट्र सरकारकडील थकलेले एक वर्षापासूनचे एक हजार रुपये त्वरित देण्यात यावे,सन २०२५ ची शेतकऱ्यांना घोषितकेलेली हेक्टरी १७५००/ नुकसान भरपाई शासनाने घोषित केले त्याप्रमाणे ती देण्यात यावी, त्याचबरोबर मजुरांचे पेन्शन तात्काळ वाटप करण्यात यावे,देशातील बेरोजगारी कमी होण्यासाठी तात्काळ नौकरी उपलब्ध करण्यात यावे,केंद्र व राज्य सरकारने पारदर्शक परीक्षा राबविण्यात याव्या.यासह इतर मागण्या आजच्या रस्ता रोको आंदोलन दरम्यान करण्यात आल्या.या रस्ता रोको आंदोलनाचे नेतृत्व सिटू संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुरे यांनी केले यावेळी कृष्णा सोळंके,अशोक पोपळे,विनायक पौळ,आसाराम राठोड,मोहन जाधव,बळीराम भूबे,बंडूराम गरड, रामचंद्र चिंचणे, अतुल सोळंके, पवन चिंचणे, रत्नाकर गोळेकर,मुसूद्दीक बाबा,रोहिदास जाधव,सुहास झोडगे,उषाऔसे, इंदुताई पाटोळे, ज्योतीताई घडसे,अर्चना पांचाळ,उर्मिला शेंडगे,सय्यद फारूक यांच्यासह इतर कार्यकर्ते सहभागी होते.

# महंत डॉ.नामदेव शास्त्रींची आ.सुरेश धस यांनी घेतली रुग्णालयात भेट

आष्टी । प्रतिनिधी

भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्रीजी यांना काही दिवसांपूर्वी अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने अहिल्यानगर येथील इम्पल्स हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय तपासणीदरम्यान त्यांच्या हृदयातील रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज आढळून आल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर अँजिओप्लास्टीची प्रक्रिया करण्यात आली.

उपचारानंतर सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांची प्रकृती सुधारत आहे. रविवारी आष्टीचे आमदार आ. सुरेश धस यांनी अहिल्यानगर येथील डॉ. संदीप गाडे यांच्या इम्पल्स हॉस्पिटलमध्ये जाऊन महंत डॉ. नामदेव शास्त्रीजींची भेट



घेतली. यावेळी त्यांनी त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस करून उपचाराबाबत डॉक्टरांकडून माहिती जाणून घेतली.

शास्त्रीजींची प्रकृती लवकरात लवकर पूर्णपणे सुधारावी आणि त्यांना उत्तम आरोग्य लाभावे, यासाठी आ. सुरेश धस यांनी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी डॉ. संदीप गाडे, दीपक तांबे, महादेव जायभाय यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

# हर्षवर्धन सपकाळ यांचे मानसिक संतुलन बिघडले -आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्याबद्दल केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दि १० ऑगस्ट सोमवार रोजी माजलगाव तहसील कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.

यावेळी आ. प्रकाश सोळंके यांनी सपकाळ यांच्या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त करत, हर्षवर्धन सपकाळ यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे, अशी



टीका केली. महिलांचा सन्मान राखला गेला पाहिजे.राजकीय मतभेद असले तरी सार्वजनिक जीवनातील महिलांविषयी बोलताना मर्यादा पाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सुनेत्रावहिनी अजितदादा पवार या महाराष्ट्राच्या जनतेच्या सेवेसाठी कार्यरत असताना त्यांच्याबद्दल करण्यात आलेले अपमानजनक व बेताल वक्तव्य निषेधार्ह आहे. अशा वक्तव्यांमुळे महिला सन्मानाला धक्का पोहोचतो. भविष्यात अशा प्रकारची वक्तव्ये होऊ नयेत,

◀◀ पान ३ वर

# बुलेटच्या कर्णकर्णश: सायलेन्सरला जिल्हा वाहतूक शाखेचा लगाम

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर जिल्हा पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्या सुचनेवरुन तसेच जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी वैभव पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश नरवडे तसेच पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली काल दि.९ ऑगस्ट २०२६ रोजी बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स, सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स येथे १७.०० ते १९.०० वाजण्याच्या दरम्यान कर्णकर्णश आवाजाच्या नागरिकांना त्रास होत असलेल्या १३ बुलेट चालकांच्या वाहनावर सायलेन्स जप्त करुन कारवाई करण्यात आली. यावेळी पोलीस



हवालदार अजिनाथ मुंडे, त्रिंबक कुडके, गणेश तळेकर, पोलीस नाईक सचिन सारणीकर, पोलीस अंमलदार संतोष मोरे, वसीम शेख, संजय टुले, तसेच शिवाजीनगर पो.स्टे.चे ग्रेड पीएसआय मच्छिंद्र राख, लिंबाजी महानोर, बीड शहरचे पोलीस अंमलदार सचिन वाघमारे, संतोष तांबे जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस अंमलदार अनिकेत घुले, पोलीस चालक दत्ता कदम इत्यादींनी सहभाग नोंदविला.

आपल्या बुलेट वाहनाला मोडीफाय सायलेन्सर बसवून शहरात ठोऽऽऽ ठो ऽऽऽ आवाज करुन नागरिकांना वेठीस धरणार्या वाहनधारकांनी यापुढे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करु नये असा इशारा जिल्हा वाहतुक शाखेने यावेळी दिला आहे.

**वाहतुकीचे नियम पाळा अन्यथा कारवाई अटळ**

यापुढे कोणीही बुलेट सायलेन्सर मोडीफाय करुन नागरिकांना त्रास होईल असे वाहन रस्त्यावर चालवणार नाही तसेच ध्वनीप्रदुषण करणार नाही याची काळजी घ्यावी अन्यथा साउंड पोल्युशन कायद्यानुसार आणि इनव्हायरमेंट प्रोटेक्शन अॅक्ट कायदा १९८६ प्रमाणे गुन्हे नोंद करून वाहन विनापरवाना मॉडीफाय केल्याबाबत जबर दंड वसूल करण्यात येईल. त्यामुळे वाहतुकीचे नियम पाळावे असे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी वैभव पाटील यांनी कळविले आहे.

# चौसाळा बस स्थानकाचे काम बंद बांधकामावर पाणी नाही तर मजुरांचे पलायन

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा तालुका बीड येथील नव्याने सुरू असलेले व संत गतीने चालू असलेले महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळच्या बस स्थानकाचे बांधकाम गेल्या तीन दिवसापासून अचानक बंद झाले आहे त्यामुळे झालेल्या बांधकामावर पाणीही मारण्यात आले नाही तर संबंधित कामावरील मजूर हे ३ दिवसापासून निघून गेल्याने बांधकाम बंद पडले आहे सदर प्रकरणी माहिती अशी की चौसाळा येथील महामंडळाच्या



वतीने गुत्तेदाराच्या मार्फत सदर चौसाळा बस स्थानकाचे काम चालू आहे गेल्या तीन दिवसापासून बांधकाम वरील मजूर येथे उपस्थित नसल्याने काम बंद पडले आहे तर सदर कामगाराला पैसे दिले नसल्याने सदर मजूर हे गावाकडे निघून गेल्याची चर्चा आहे सदर बांधकाम सुरू राहावे यासाठी स्थानिक चे कार्यकर्ते तथा चौसाळ्याचे सरपंच पती श्री बाबुशेठ

◀◀ पान ३ वर

# स्मशानभूमीच्या नोंदीसाठी अर्धनग्न आंदोलन

केज । प्रतिनिधी

साळेगाव येथील बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीची महसूल अभिलेखात अधिकृत नोंद घेण्यात यावी आणि स्मशानभूमीला संरक्षण भिंत बांधण्यात यावी. या मागणीसाठी युवा कार्यकर्ता रोशन सरवदे यांनी ग्रामंचायत कार्यालयात अर्धनग्न आंदोलन केले.

सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत सदस्या रेखा सरवदे यांचे चिरंजीव आणि सामाजिक युवा कार्यकर्ते रोशन सरवदे यांनी बौद्ध समाजाच्या जुन्या स्मशान भूमीला संरक्षण भिंत नसल्यामुळे भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता निर्माण असून, यामुळे समाजाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक भावनांना ठेच पोहोचत असल्याने मागील दोन वर्षां पासून स्मशानभूमीची महसूल अभिलेखात नोंद करणे. तसेच संरक्षण भिंत उभारण्याची मागणी करण्यात आलेली असतानाही अद्याप ठोस प्रशासकीय कार्यवाही झालेली नसल्याने ग्रामपंचायत कार्यालयात अर्धनग्न आंदोलन केले.

◀◀ पान ३ वर

# वस्तीगृहातील मुलांना निकृष्ट अन्न; संस्थाचालक मात्र गब्बर

केज, धारूर ,वडवणासाठी एकच संचालक; सामाजिक कार्यकर्ते तक्रार करणार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गोरगरीब मुलांना तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांना उत्कृष्ट जेवण मिळावे त्यांचे शिक्षण सुरळीत पार पाडावे यासाठी सरकारने कोट्यावधी रुपयाचा खर्च करून वस्तीगृहांना अनुदान दिले. मात्र या वसतीग्रहाच्या संचालकाकडून विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा अन्नधान्य पुरवठा करुन शासनाकडून लाखोचा मलीदा लाटला. विद्यार्थ्यांची मात्र हेळसांड चालू आहे. बीड जिल्ह्यातील केज, धारूर, वडवणी तालुक्यामध्ये एकाच संचालकाकडून तीन वस्तीग्रहे चालवली जातात. या वस्तीगृहांमध्ये निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते. मात्र संस्थाचालक शासनाच्या पैशावर गब्बर होतांना दिसत आहेत. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर चांदणे यांनी समाज कल्याण विभागासह अन्न औषध प्रशासन विभागाकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले.

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक संस्थांकडून वसतिगृहे चालविली जातात. या वस्तीग्रहांना सरकारच्या वतीने विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था आणि त्यांच्या जेवणाचा सर्व खर्च केला जातो. सकाळच्या नाश्त्यासाठी कडधान्य, डाळी,अंडी तर दुपारच्या जेवणासाठी पालेभाज्या आदींचा पुरवठा होतो. मात्र संस्थाचालकाकडून निकृष्ट दर्जाचे धान्य आणून ते विद्यार्थ्यांना खाऊ घातले जाते. या वस्तीग्रहणांना पुरवठा करणारे ही यात आपला जास्तीत जास्त कसा फायदा होईल याचा विचार करून निकृष्ट अन्नधान्य पुरवतात. यात वस्तीग्रह चालक आणी पुरवठादार दोघेही गब्बर होत असले तरी विद्यार्थ्यांना निकृष्ट अन्न मिळत असल्याने त्यांची वाटचाल कुपोषणाकडे होत आहे. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यातील केज धारूर आणि वडवणी तालुक्यामध्ये एकाच संस्थाचालकाकडे वस्तीग्रहे देण्यात आले आहे. हा संस्थाचालक प्रशासनात अधिकारी असल्याचे सांगितले जात आहे. आपल्या पदाचा गैरवापर करून ही वस्तगृहे मंजूर करून घेतली आणि त्यातून विद्यार्थ्यांना सुविधा न देता लाखोंचा मलिदा लाटण्याचा उद्योग सध्या सुरू आहे. या वस्तीग्रहांना अन्नधान्य पुरवण्याचे ज्यांच्याकडे कंत्राट आहे तेही मालामाल होत आहेत. यांना धडा शिकवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर चांदणे यांनी समाज कल्याण विभागासह अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले. याची चौकशी झाली नाही तर आपण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचेही प्रभाकर चांदणे यांनी सांगितले.

# बीडमध्ये सत्यशोधक पुरस्कार सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिपक थोरातांच्या सामाजिक कार्याचे मान्यवरांकडून कौतुक

बीड । प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सत्यशोधक प्रतिष्ठान, थोरातवाडी-बीड, आरंभ यांच्या वतीने आयोजित सत्यशोधक पुरस्कार सोहळा २०२६ रविवारी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. या सोहळ्यास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत एकजुटीचे दर्शन घडविले. सामाजिक, पत्रकारिता, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, पोलीस तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सत्यशोधक पुरस्काराने



गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती अपेक्षित होती. मात्र, अचानक तब्येत बिघडल्यामुळे ते कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीतही मान्यवरांची मोठी उपस्थिती आणि समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित होते. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष, मानवी हक्क अभियान तथा जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथील प्रा. डॉ. मिलिंद नाना आव्हाड, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन भाऊ साठे, भाजपचे युवा नेते तथा नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी दैनिक

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26